सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १५ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ३१ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राज्यात ३० जूनपासून मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाचा 'श्रीगणेशा'

### 'एसआयआर' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर; ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार

तभा वृत्तसेवा

मुंबई : लोकशाहीचे अविभाज्य अंग असलेल्या मतदार याद्या अधिक पारदर्शक आणि त्रुटीरहित करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एसआयआर) मोहीम हाती घेतली आहे. पश्र्चिम बंगालसह मोठ्या राज्यांत या मोहिमेचे दोन टप्पे पार पडल्यानंतर आता महाराष्ट्रासह देशातील १६ राज्यांमध्ये 'एसआयआर' मोहिमेची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार, येत्या ३० जूनपासून राज्यातील निवडणूक यंत्रणा थेट मतदारांच्या दारापर्यंत पोहोचणार असून, पडताळणीची ही प्रक्रिया २९ जुलैपर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेनंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.



राज्यातील एकूण ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदी तपासण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. यासाठी राज्यात ९७ हजार ९२४ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची (बीएलओ) नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी घरोघरी जाऊन नवीन मतदार नोंदणी, मयत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि पत्ता किंवा इतर दुरुस्त्यांचे काम पाहतील. या प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचा (बीएलए) सहभागही अनिवार्य करण्यात आला असून, प्रत्येक केंद्रावर पारदर्शकता जपण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.निवडणूक आयोगाने सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाशी समन्वय राखून हा कार्यक्रम निश्र्चित केला आहे. मतदार नोंदणीसह मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्याचे कामही २९ जुलैपर्यंत पूर्ण केले जाणार आहे. ज्या मतदारांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांच्यासाठी नाव नोंदणीची ही मोठी संधी असून, त्रुटीरहित यादी तयार करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक विभागाने केले आहे. 'एसआयआर' कार्यक्रमाचा आराखडा असा घरोघरी जाऊन पडताळणी : ३० जून ते २९ जुलै प्रारूप (कच्ची) मतदार यादी प्रसिद्धी : ५ ऑगस्ट दावे व हरकती नोंदवण्याची मुदत : ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी : ७ ऑक्टोबर.

## 'मोदींनी तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलवावी : शरद पवार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी आज पत्रकार परिषद घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला जागतिक तेल संकटाच्या पार्श्र्वभूमीवर इंधन बचतीचे आवाहन केलं आहे. यासाठी खासगी वाहनांचा वापर करणे, सोने खरेदी न करणे, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करणे, वर्क फ्रॉम होम करणे असं आवाहन मोदी यांनी देशाच्या जनतेला केलं आहे. पंतप्रधान मोदी यांच्या या भूमिकेवर शरद पवार यांनी आज पत्रकार परिषदेत प्रतिक्रिया दिली. या मुद्द्यावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या टीकेवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पण मुख्यमंत्र्यांनी राहुल गांधी यांच्याबाबत जे वक्तव्य केलं ते अयोग्य होतं, असं शरद पवार म्हणाले आहेत. तसेच सध्याच्या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवावी आणि स्वत: या बैठीकाला हजर राहावं, असं शरद पवार म्हणाले आहेत.**

**मी विनंती केली, परिस्थिती किती गंभीर आहे, अशावेळेला देशातील सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक अनेकदा आपण बोलवतो तशी बैठक बोलवावी. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: हजर राहावं. याआधी गेले तीन–चार वर्षांत सर्वपक्षीय बैठका झाल्या. पण त्यापैकी एकाही बैठकाला पंतप्रधान उपस्थित नव्हते. परिस्थिती गंभीर आहे, असंच चालू राहिली तर किती गंभीर परिणाम होतील हे जे पंतप्रधान सांगण्याचा प्रयत्न करत आहेत, त्याची तितक्याच गांभीर्याने सर्वांनी नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांची उपस्थिती महत्त्वाची आहे, अशी भूमिका शरद पवारांनी मांडली.**

## देवेंद्र बुलेटवरून पोहचले विधानभवनात

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काटकसरीच्या आवाहनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बुलेटवरून प्रवास केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खर्चात बचत व्हावी म्हणून दुचाकीवर (बुलेट) विधानभवनात प्रवेश केला. त्यांनी वर्षा ते विधानभवन असा प्रवास केला.

## राहुलच्या परदेश यात्रांना परदेशातून फंडिंग ?

नवी दिल्ली : राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांवर भाजपने गंभीर आरोप केले आहेत. राहुल गांधींच्या दौऱ्यांवर भाजपने सवाल उपस्थित केले आहेत. '२२ वर्षात राहुल गांधी यांच्या ५४ परदेशवाऱ्या झाल्या. त्यांच्या या दौऱ्यांना परदेशातून फंडिंग मिळत आहे? परदेशातून फंडिंग होत असेल तर सरकारकडून परवानगी घ्यावी लागते. २००४ ते २००६ पर्यंत राहुल गांधींच्या परदेश यात्रांवर ६० कोटी खर्च झालेला आहे', असे गंभीर आरोप भाजपचे संबित पात्रा यांनी केले आहेत.

## निफाडला अवकाळीचा तडाखा

नाशिक : निफाड तालुक्याच्या पूर्व भागातील शिरवाडे, वाकद, देवगाव, कानळद, मानोरी आदी गावांमध्ये बुधवारी (दि. १३) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. प्रचंड वेगाने वाहणारे वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

## नराधमाला फाशी द्या

पुणे : नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून खून केल्याची घटना घडल्यानंतर सर्व स्तरांतून नराधम आरोपीला फाशीची कठोर शिक्षा व्हावी, अशी एकमुखाने मागणी होऊ लागली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे.

## चाकणकर तीन दिवस खरात सोबत ?

मुंबई : भोंदू अशोक खरात याच्याशी संबंध नाही म्हणणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर तीन दिवस गुवाहाटीच्या हॉटेल ब्ल्यू रेडिसनमध्ये एकत्र होत्या, असा घणाघाती आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. रुपाली चाकणकर यांच्यासोबत त्यांची बहीण प्रतिभा चाकणकरही होती का? असा सवालही अंधारे यांनी विचारला आहे.

## विमानतळ विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा

नागपूर : उपराजधानीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरण आणि विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा झाला. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर या विमानतळाच्या संचालनासाठी जमिनीचा भाडेपट्टा वाढवून देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

## फ्रान्सच्या क्रूझवर लॉकडाऊन

फ्रान्स : यूरोपच्या एमव्ही होंडियस क्रूझ शिपवरील हंटाव्हायरसच्या थरारनंतर, आता ब्रिटिश क्रूझ शिप ॲम्बिशनवर डझनभर प्रवासी अचानक आजारी पडल्याने जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. क्रूझवरील प्रवाशांना देखील हंटा व्हायरसची लागण झाल्याचा संशय घेत प्रशासनाकडून तातडीने या शिपला लॉकडाऊन करण्यात आले.

## केंद्र सरकारची साखरेच्या निर्यातीवर बंदी

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : सोनं खरेदी करु नका, पेट्रोल-डिझेल जपून वापरा असं सांगितल्यानंतर आता पुन्हा एकदा केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरकारने साखरेच्या निर्यातीवर तात्काळ बंदी लागू केली आहे. यामध्ये कच्ची साखर , पांढरी साखर आणि शुद्ध साखर (ठशषळपशव ीीसरी) यांचा समावेश असणार आहे. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत साखर निर्यातीवर बंदी लागू असणार आहे.

आखाती देशातील युद्धांमुळे महागाईचा भडका उडाला आहे. सोन्याच्या पाठोपाठ एलपीजी, पेट्रोल, डिझेलने उच्चांक गाठला आहे. डॉलर अधिक मजबूत झाला आहे. त्या पार्श्र्वभूमीवर केंद्र सरकारने सोने खरेदी न करण्याचे तसेच ,पेट्रोल, डिझेल जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान केंद्र सरकारने पुन्हा एकदा मोठा निर्णय घेत साखरेच्या निर्यातीवर तात्काळ बंदी लागू केली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत साखरेच्या किमतींवरचा दबाव वाढत आहे. त्यामुळे साखर निर्यातीवर निर्बंध घालून, देशांतर्गत साखरेचा पुरवठा सुधारेल आणि किमती नियंत्रणात राहतील.

साखरेवरील बंदी उदङ आणि ढठट कोट्यांतर्गत युरोपियन युनियन आणि अमेरिकेला केली जाणारी साखर निर्यात; 'अग्रिम प्राधिकार योजने' अंतर्गत होणारी निर्यात; किंवा इतर राष्ट्रांच्या अन्नसुरक्षेच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने 'सरकार-ते-सरकार' स्तरावर केली जाणारी निर्यात यांना लागू होणार नाही. तसेच, ज्या साखरेच्या खेपांची निर्यात प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे, त्यांनाही या निर्बंधातून वगळण्यात आले आहे. ब्राझीलपाठोपाठ, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर निर्यातदार देश आहे. देशांतर्गत मागणीपेक्षा साखरेचे उत्पादन अधिक होईल, या अंदाजाने भारताने यापूर्वी साखर कारखान्यांना १५ लाख मेट्रिक टन साखरेची निर्यात करण्यास परवानगी दिली होती. तथापि, आता असा अंदाज वर्तवला जात आहे की, साखर उत्पादक प्रमुख क्षेत्रांमध्ये उसाचे उत्पादन कमी झाल्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी साखरेचे उत्पादन देशांतर्गत खपाहून कमी पडेल.

साखरेच्या निर्यातीवरची बंदी म्हणजे शेतकऱ्यांची अशी अवस्था झाली आहे की 'आई जेवू घालेना आणि बाप भीक मागू देईना'...चार वर्षे सरकारने एमएसपी न वाढवल्यामुळे साखरेचे दर स्थिर राहिले आहेत. स्वतः देखील भाव वाढवत नाही आणि परदेशात चांगला दर मिळत असेल तर त्याला देखील तुम्ही बंदी घालता. कारखानदार आणि आमचं भांडण आहेच पण साखरेला दर मिळाला नाही तर कारखानदार तरी काय करणार?, असा सवाल शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उपस्थित केला.

## वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी इंधन बचतीसाठी राज्य सरकारकडून नियमावली

तभा वृत्तसेवा

मुंबई : पश्र्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्भवलेल्या इंधन टंचाईच्या पार्श्र्वभूमीवर राज्य शासनाने काटकसरीचे कठोर धोरण स्वीकारले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत, महाराष्ट्र सरकारने परदेश दौऱ्यांवर बंदी, सार्वजनिक वाहतुकीचा सक्तीचा वापर आणि ऊर्जा बचतीसाठी नवी नियमावली जाहीर केली आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या संदर्भातील शासन परिपत्रक जारी केले.

जागतिक स्तरावर इंधन पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची शक्यता असल्याने प्रशासकीय स्तरावर अनावश्यक खर्च टाळणे आणि इंधन बचत करणे हे या उपाययोजनांचे मुख्य उद्दिष्ट आहे. शासकीय वाहनांच्या अनावश्यक वापराला लगाम घालण्यासाठी 'कारपूलिंग' आणि सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करावा, असे सुचविण्यात आले आहे. तसेच, सरकारी अधिकाऱ्यांचे सर्व प्रस्तावित परदेश दौरे तात्पुरते रद्द करण्यात आले असून नवीन नियोजनावर बंदी घालण्यात आली आहे.

मंत्रालय, विभागीय आणि जिल्हा स्तरावरील बैठका, प्रशिक्षण आणि सेमिनारसाठी आता प्रवासाचा खटाटोप करावा लागणार नाही. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून सर्व कामकाज डिजिटल माध्यमातून उरकण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही या नियमावलीचे पालन करावे लागणार आहे.

ऊर्जा बचतीसाठी कार्यालयांतील वातानुकूलन यंत्रणेचे (एसी) तापमान २४ ते २६ अंशांदरम्यान ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, पोलीस विभागाला वाहनांच्या मिरवणुका आणि बाईक रॅलींना परवानगी नाकारण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील सहा महिने कोणत्याही नवीन सल्लागारांची नियुक्ती करू नये आणि खर्चिक शासकीय जाहिरातींवर मर्यादा आणाव्यात, असेही परिपत्रकात नमूद केले आहे.

## राज्यात सीएनजी च्या दरात वाढ

तभा वृत्तसेवा

मुंबई : एलपीजी सिलिंडर, अमूल आणि मदर डेअरीच्या दुधानंतर आता महागाईची आणखी एक लाट आली आहे. मुंबईत सीएनजी महाग झाला आहे. सीएनजी प्रति किलो २ ने महाग झाला आहे. मुंबईत सीएनजीचा नवीन दर आता प्रति किलो ८४ झाला आहे. परिणामी, मुंबईतील प्रवाशांना आणि सार्वजनिक वाहतूक चालकांना आता त्यांच्या प्रवासासाठी अधिक पैसे मोजावे लागतील.




एमजीएल, म्हणजेच महानगर गॅस लिमिटेडने कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसच्या किरकोळ दरात प्रति किलो २ ची वाढ जाहीर केली आहे. पश्र्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात निर्माण झालेली अस्थिरता आणि इंधन खरेदी खर्चात झालेली वाढ, ही यामागील कारणे असल्याचे कंपनीने सांगितले.

मुंबईत सीएनजीचे वाढलेले दर १४ मे रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून लागू झाले आहेत. एमजीएलने बुधवारी जाहीर केले होते की, आज मध्यरात्री १२ वाजल्यापासून सीएनजीच्या दरात प्रति किलो २ ची वाढ होईल, ज्यामुळे शहर आणि आसपासच्या परिसरात नवीन दर प्रति किलो ८४ होईल. बुधवारच्या निवेदनानुसार, जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीतील भू-राजकीय अस्थिरता, महागड्या गॅस स्रोतांवरील वाढलेले अवलंबित्व, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि रुपयाचे अवमूल्यन यामुळे गॅस खरेदीचा खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे.

सीएनजीच्या दरवाढीचा परिणाम प्रवाशांवरही होईल. भाडेवाढ होईल. या दरवाढीचा मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेवर तात्काळ परिणाम होण्याची शक्यता आहे, जिथे आता अधिकाधिक वाहने सीएनजीसारख्या स्वच्छ आणि स्वस्त इंधनाकडे वळत आहेत. एमजीएलच्या मते, एमएमआरमध्ये अंदाजे १२.८ लाख वाहने सीएनजीवर चालतात. यामध्ये अंदाजे ४.७ लाख ऑटो-रिक्षा, १.६ लाखांहून अधिक टॅक्सी आणि ५ लाखांहून अधिक खाजगी गाड्यांचा समावेश आहे.

## 'केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या', राज ठाकरे यांची पंतप्रधान मोदींकडे मागणी

तभा वृत्तसेवा

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नीट परीक्षा गोंधळावर आपली रोखठोक भूमिका मांडली आहे. केंद्र सरकारची प्रत्येक विषयात गोंधळ घालून लोकांना वेठीस धरण्याची परंपरा सुरूच आहे. 'छएएढ' पेपरफुटीने परत एकदा हे सिद्ध झालं. 'छएएढ' चा पेपर १० लाख रुपयांना विकत घेतला गेला. आणि याची मुळं सापडली महाराष्ट्रात. अर्थात हे पेपरफुटीचं जाळं देशव्यापी आहे. यांत 'छएएढ' साठी तयार करून घेणाऱ्या कोचिंग क्लासेसचा पण हात आहे. हे सगळं झाल्यावर केंद्र सरकारने काय केलं तर परीक्षा रद्द केली आणि सीबीआय चौकशी लावली. या आधी पण २०२४ ला सीबीआय चौकशी अशाच एका प्रकरणात लावली होती त्यातून काही साध्य झालं नाही. या सगळ्यात आपण आपलं काम केलं असा सरकारचा आविर्भाव आहे. पण २२ लाख मुलांचं आणि त्यांच्या कुटुंबीयांचं आयुष्य टांगणीला लागलं त्याचं काय?, असा सवाल राज ठाकरे यांनी केला आहे.

मुळात २०१६ ला 'छएएढ' लादण्याची गरजच नव्हती. पण सगळं एकछत्री अंमलाखाली आणण्याची या सरकारची खुमखुमी इतकी तीव्र आहे की मग काही लाख लोकांच्या आयुष्याचा खेळखंडोबा झाला तर काय फरक पडतो? 'छएएढ' बद्दल मी २०१६ पासून आक्षेप नोंदवत होतो. या परीक्षांमुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचं नुकसान होणार आणि जे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, ते महागडे कोचिंग क्लासेस लावणार. पुढे हे क्लासवाले आर्थिक शक्तीच्या जोरावर परीक्षांचे निकाल हवे तसे वाकवणार हे मला दिसत होतं आणि सामान्य घरातील मुलं, मुली भरडली जाणार हे मला दिसत होतं आणि म्हणून २०१६ पासून आम्ही याला विरोध करतोय, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली.

माझ्या सारखाच विरोध दक्षिणेतील नेत्यांनी पण केला. सध्याचे तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री विजय पण 'छएएढ' रद्द करा म्हणून आग्रह धरत आहेत. कारण दक्षिणेतील ५ राज्य आणि महाराष्ट्र मिळून जवळपास ३५० च्या वर मेडिकल कॉलेजेस आहेत आणि वरती उत्तरेतली मोठ्या राज्यांमध्ये फक्त १८० मेडिकल कॉलेजेस आहेत. त्यामुळे उत्तरेतील विद्यार्थी दक्षिणेत घुसवण्यासाठी हा सगळा अट्टाहास २०१६ पासून सुरु आहे. आणि त्यासाठी कोचिंग क्लासेसचं सगळ्यात मोठं जाळं उत्तरेतल्या राज्यांत आहे. आणि व्यवस्था कशी वाकवायची हे त्यांना नीट माहित आहे. प्रश्र्न इतकाच आहे की अशा सडलेल्या व्यवस्थेतून जे डॉक्टर्स बाहेर पडतील त्यांच्या हातात आपण आपलं आरोग्य देणार आहोत का? आणि का तर केंद्राला वाटलं की यापुढे मेडिकल प्रवेशासाठी एकच परीक्षा हवी म्हणून?, असा देखील सवाल राज ठाकरेंनी केला.

## होर्मुझमध्ये भारतीय जहाज 'हाजी अली'वर भीषण ड्रोन हल्ला; अग्नितांडवानंतर जहाजाला जलसमाधी

वृत्तसंस्था

नवी दिल्ली/मस्कत: होर्मुझच्या सामुद्रधुनीत भारतीय जहाजावर भीषण हल्ला झाला आहे. 'हाजी अली' नावाच्या जहाजावर ओमानच्या सागरी किनाऱ्यावर ड्रोन हल्ला झाला. हल्ल्याची तीव्रता अतिशय जास्त होती. हल्ल्यानंतर हाजी अली जहाजाला जलसमाधी मिळाली. हाजी अली मालवाहू जहाज होतं. इराण युद्धादरम्यान भारतीय जहाजांवर ड्रोन हल्ले झाल्याच्या मोजक्या घटना घडल्या आहेत. हाजी अलीवर नेमका कोणी हल्ला केला, याबद्दल स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.



हाजी अली जहाजावर १४ जण होते. ओमानच्या नौदलानं त्या १४ जणांना वाचवलं आहे. मालवाहू जहाज 'हाजी अली' (चड्त क-गख -डख इउख १४९२) गुजरातच्या देवभूमी द्वारका जिल्ह्यातील आहे. आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत भारतीय जहाज बुडाल्याची ही दुसरी घटना आहे. आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात सुरु असलेल्या तणावाचा सर्वाधिक फटका गुजरातमधील जहाज उद्योगाला बसताना दिसत आहे. आठवड्याभरापूर्वी गुजरातमधील 'अल फैज नूर सुलेमानी-१' जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीत बुडालं. अमेरिका आणि इराणच्या सैन्यात तुफान गोळीबार झाला. या धुमश्र्चक्री दरम्यान 'अल फैज नूर सुलेमानी- १' जहाजानं जलसमाधी घेतली.

१३ मे रोजी भारतीय जहाज सोमालियाच्या बरबराहून शारजाहच्या दिशेनं जात होतं. जहाज ओमानच्या लिमाह जवळून जात असताना एक ड्रोन जहाजावर धडकलं. त्यानंतर मोठा स्फोट झाला. यामुळे जहाजावर आग लागली. आग लागल्यावर जहाज समुद्रात बुडू लागलं. ही बाब लक्षात येताच जहाजावरील १४ जणांनी टाईम सिग्नलचा वापर करुन लाईफ जॅकेट्सची मदत घेत स्वत:चा जीव वाचवला. ओमान तटरक्षक दलानं तात्काळ हालचाली केल्या. त्यामुळे सर्व भारतीय खलाशी वाचले. अपघातानंतर त्यांना ओमानच्या दिबा बंदरात पोहोचवण्यात आलं. जहाजावरील १४ जणांना सुरक्षित वाचवण्यात आल्याच्या माहितीला 'हाजी अली'चे मालक सुलतान अहमद संघार यांनी दुजोरा दिला आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं जहाजावरील हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. 'ओमानच्या किनाऱ्यावर भारतीय झेंडा असलेल्या जहाजावर झालेला हल्ला स्वीकारार्ह नाही. व्यापारी आणि सामान्य नागरिकांच्या जहाजांना सातत्यानं लक्ष्य केलं जात आहे. त्याचा आम्ही निषेध करतो,' असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पुष्पा इम्पॉसिबलमध्ये खास कलाकारांची साथ

सोनी सबची पुष्पा इम्पॉसिबल मालिका प्रेक्षकांसाठी एक खास आणि हृदयस्पर्शी भाग घेऊन येत आहे. ब्लॉकबस्टर गुजराती चित्रपट लालो – कृष्ण सदा सहायतेचा कलाकार वर्ग मालिकेत विशेष उपस्थिती दाखवणार आहे. हा भाग चित्रपटाच्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरच्या आधी दाखवला जाणार आहे. बॉक्स ऑफिसवर इतिहास घडवत ₹100 कोटींचा टप्पा पार करणारा पहिला गुजराती चित्रपट ठरलेला लालो आता 17 मे रोजी दुपारी 1 वाजता सोनी मॅक्सवर हिंदी आणि गुजराती अशा दोन्ही भाषांमध्ये प्रेक्षकांसाठी उपलब्ध होणार आहे.

## डेलनाझ इराणी यादें मालिकेत दिसणार खास भूमिकेत

सोनी सबची यादें मालिका आपल्या भावनिक कथानक आणि व्यक्तिरेखांच्या स्तरित प्रवासामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. या कथानकात आणखी एक रोचक वळण आणण्यासाठी ज्येष्ठ अभिनेत्री डेलनाझ इराणी मालिकेत खास भूमिका साकारण्यासाठी सज्ज आहेत. स्मरणीय अभिनय आणि रंगतदार स्क्रीन प्रेझेन्ससाठी ओळखल्या जाणाऱ्या डेलनाझ यांची ‘चांदनी’ ही भूमिका कथानकाला नवा रंग देणार आहे. एकेकाळी लाखो चाहत्यांची लाडकी असलेली चांदनी अजूनही प्रसिद्धी, ग्लॅमर आणि आदराच्या जगात जगत असते.

## भारती एअरटेलची चौथ्या तिमाहीत मजबूत कामगिरी

मुंबई-भारती एअरटेल लिमिटेडने मार्च 2026 अखेर संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर करत दमदार कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन गोपाल विठ्ठल यांनी सांगितले की, “आर्थिक वर्ष 26 हे वर्ष एअरटेलसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. आम्ही 650 दशलक्ष ग्राहकांचा टप्पा गाठला, डिजिटल नेटवर्क विस्ताराला गती दिली आणि एआय व डेटा सेंटर क्षेत्रात मोठी प्रगती साधली. भारतात दर्जेदार डिजिटल सेवा देण्यासाठी आणि भविष्यातील गरजांसाठी सक्षम नेटवर्क उभारण्यासाठी आम्ही सातत्याने गुंतवणूक करत राहू. तसेच स्वच्छ ऊर्जेच्या वापराला प्राधान्य देत डिझेलमुक्त ऑपरेशन्सकडेही आमचा भर राहणार आहे.”

## ‘अल्ट्रा झकास’वर ‘अभंग तुकाराम’चा दमदार ट्रेलर रिलीज

मुंबई : “ज्ञानोबा माऊली-तुकाराम”च्या अखंड नामघोषात आणि टाळ-मृदंगाच्या भक्तिमय निनादात रंगलेला ‘अभंग तुकाराम’ हा बहुचर्चित चित्रपट आता प्रेक्षकांच्या घराघरांत पोहोचण्यासाठी सज्ज होणार आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या जीवनावर आधारित या भव्य चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर येत्या १५ मे २०२६ रोजी ‘अल्ट्रा झकास’ ओटीटी प्लॅटफॉर्मवर होणार असून, त्याचा बहुप्रतीक्षित ट्रेलर आज ११ मे रोजी प्रदर्शित झाला आहे. ‘अभंग तुकाराम’ या चित्रपटात प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण संत तुकाराम महाराजांची भूमिका साकारली असून, अभिनेत्री स्मिता शेवाळे त्यांच्या पत्नी आवलीच्या भूमिकेत झळकणार आहेत. याशिवाय अजय पुरकर, समीर धर्माधिकारी यांच्यासह अनेक दमदार कलाकार या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसणार आहेत. चरित्रपट, नाटक आणि ऐतिहासिक या धाटणीतील हा चित्रपट संत तुकाराम महाराजांच्या जीवनप्रवासाची, त्यांच्या सामाजिक समतेच्या विचारांची आणि अभंगांमधून दिलेल्या जीवनतत्त्वज्ञानाची प्रभावी कहाणी मांडतो. पत्नी आवलीच्या साथीने समाजप्रबोधनाचा मार्ग स्वीकारणाऱ्या तुकाराम महाराजांचा संघर्ष, भक्ती आणि प्रेमाचा प्रवास या चित्रपटातून उलगडणार आहे. कविता, अभंग आणि संगीताच्या माध्यमातून ही कथा प्रेक्षकांच्या मनात नक्कीच भक्तिभाव जागवणारी ठरेल.

## भारती एअरटेलची चौथ्या तिमाहीत मजबूत कामगिरी

मुंबई -भारती एअरटेल लिमिटेडने मार्च 2026 अखेर संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर करत दमदार कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन गोपाल विठ्ठल यांनी सांगितले की, “आर्थिक वर्ष 26 हे वर्ष एअरटेलसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. आम्ही 650 दशलक्ष ग्राहकांचा टप्पा गाठला, डिजिटल नेटवर्क विस्ताराला गती दिली आणि एआय व डेटा सेंटर क्षेत्रात मोठी प्रगती साधली. भारतात दर्जेदार डिजिटल सेवा देण्यासाठी आणि भविष्यातील गरजांसाठी सक्षम नेटवर्क उभारण्यासाठी आम्ही सातत्याने गुंतवणूक करत राहू. तसेच स्वच्छ ऊर्जेच्या वापराला प्राधान्य देत डिझेलमुक्त ऑपरेशन्सकडेही आमचा भर राहणार आहे.”

## अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स आणि आयएचजी हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स यांच्यात करार

मुंबई : भारतातील सर्वात मोठी खाजगी विमानतळ चालवणारी कंपनी अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड (एएएचएल) आणि जगातील अग्रगण्य हॉस्पिटॅलिटी कंपन्यांपैकी एक असलेल्या आयएचजी हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स यांनी, भारतातील प्रमुख विमानतळांजवळील आणि वेगाने विकास होत असलेल्या शहरी भागांमध्ये पाच हॉटेल्स विकसित करण्यासाठी एक महत्त्वाचा व्यवस्थापित हॉटेल पोर्टफोलिओ करार केला आहे.या करारानुसार आयएचजीच्या विविध ब्रँड्सअंतर्गत 1500 पेक्षा जास्त खोल्यांची सुविधा तयार केली जाणार आहे. हा आयएचजीचा भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा हॉटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन करार आहे. भारतातील वाढती प्रवास मागणी तसेच विमान वाहतूक, पर्यटन आणि विमानतळ-केंद्रित शहरी विकासाचा वेग लक्षात घेऊन हा प्रकल्प राबवला जात आहे.

# हजारो वह्यांपासून साकारले धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे रेखाचित्र



तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ :- धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त आमदार विलास बापू भुमरे यांच्या संकल्पनेतून पैठण तालुक्यात एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येत आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची प्रेरणा आणि संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने तब्बल २० हजार वह्यांपासून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य रेखाचित्र साकारण्यात आले आहे.

स्वराज्याचे दुसरे छत्रपती, पराक्रम, त्याग आणि धर्मरक्षणाचे प्रतीक असलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. शैक्षणिक उपयोगासाठी असलेल्या वह्यांपासून तयार होणारे हे भव्य रेखाचित्र समाजामध्ये इतिहासाविषयी अभिमान, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची भावना जागृत करणारे ठरेल.

हा उपक्रम विलास बापू भुमरे प्रतिष्ठान, पैठण यांच्या वतीने आयोजित केला असून कलाकार उद्देश पघळ यांनी हे भव्य रेखाचित्र साकारले.

या उपक्रमास विद्यार्थी, युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले.

यावेळी सर्व स्थानिक शिवसेना पदाधिकारी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक उपस्थित राहिले.

# नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द : पेपर लीक प्रकरणाची केंद्रीय यंत्रणांकडून निष्पक्ष चौकशी व्हावी - अभाविप

**छत्रपती संभाजीनगर** | अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) नीट-यूजी २०२६ परीक्षेशी संबंधित समोर येत असलेल्या पेपर लीक तसेच परीक्षेची गोपनीयता आणि विश्वासार्हतेबाबत निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नांवर चिंता व्यक्त करते. विविध माध्यमांमधून, नेशनल टेस्टिंग एजेंसी (NTA) तसेच तपास यंत्रणांकडून समोर येत असलेल्या माहितींमुळे देशभरातील लाखो विद्यार्थी व पालकांच्या मनात परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द करण्यात येणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. विशेष म्हणजे २०२४ मध्येही अशाच प्रकारच्या घटना समोर आल्यानंतर पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होणे अत्यंत निराशाजनक आहे.

अभाविपचे स्पष्ट मत आहे की प्रवेश परीक्षांच्या शुचितेशी व विश्वासार्हतेशी कोणत्याही प्रकारची तडजोड स्वीकारली जाऊ शकत नाही. परीक्षा होण्यापूर्वी प्रश्नपत्रिका किंवा त्यासंबंधित माहिती काही लोकांपर्यंत पोहोचत असेल, तर तो केवळ परीक्षा व्यवस्थेवर आघात नसून वर्षभर परिश्रम करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी अन्याय आहे.

अभाविप केंद्र सरकारकडे मागणी करते की, या संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय यंत्रणांकडून निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करण्यात यावी तसेच यामध्ये दोषी आढळणारे परीक्षा माफिया, संबंधित व्यक्ती आणि कोणत्याही स्तरावर सहकार्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत नेशनल टेस्टिंग एजेंसी (NTA) ने संपूर्ण प्रकरणात पारदर्शकता ठेवत विद्यार्थ्यांसमोर व पालकांसमोर वस्तुस्थिती स्पष्ट करावी.

अभाविप देवगिरी प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे म्हणाले की, “देशातील लाखो विद्यार्थी अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर आणि संघर्षानंतर नीटसारख्या परीक्षांना सामोरे जातात. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारची अनियमितता विद्यार्थ्यांच्या मनोबलावर आणि भविष्यावर गंभीर परिणाम करणारी असते. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असून दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाऊ नये. तसेच विद्यार्थ्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, संयम राखावा आणि घाबरून जाऊ नये. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांच्या हितासाठी, पारदर्शक परीक्षा व्यवस्था आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने आवाज उठवत राहील.”

# मुंबईत भाजप परभणी ग्रामीण जिल्ह्याची महत्त्वपूर्ण बैठक; संघटन बळकटीसाठी प्रशिक्षण वर्ग नियोजनाचा आढावा



**छत्रपती संभाजीनगर** | भारतीय जनता पार्टीच्या परभणी ग्रामीण जिल्ह्याच्या प्रभारी म्हणून आमदार संजय केणेकर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे पहिली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पक्ष संघटन अधिक सक्षम, गतिमान आणि प्रभावी करण्याच्या दृष्टीने विविध विषयांचा सखोल आढावा घेण्यात आला.

बैठकीस राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांच्यासह पक्षाची कोअर टीम उपस्थित होती.

बैठकीदरम्यान पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण वर्ग तसेच एसआयआर संदर्भातील विविध विषयांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. तसेच येत्या १९ व २० तारखेला रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, ठाणे-मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा प्रशिक्षण वर्गाच्या नियोजन, तयारी आणि संघटनात्मक बांधणीचा व्यापक आढावा घेण्यात आला.

पक्ष कार्यकर्त्यांना वैचारिक, संघटनात्मक आणि नेतृत्वाचे बळ देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा प्रशिक्षण वर्ग प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस आ. सिताराम घनदाट मामा, डॉ. केदारजी खटींग, संतोषराव मुरकुटे, डॉ. पंडितराव दराडे, आकाशराव लोहट, प्रसादराव खारकर, रंगनाथराव सोळंके आणि रुषिकेश सकनूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

## जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा विभागासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पुढील काही दिवसांत तापमानात वाढ होऊन उष्णतेची लाट (Heat Wave) येण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. गेल्या काही दिवसांत मराठवाडा विभागात कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक नोंदवले गेले असून ते सरासरीपेक्षा ५.१ अंश सेल्सिअसने जास्त आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी नागरिकांना आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

**सध्याची रुग्णस्थिती** | जिल्ह्यात उष्माघात सदृष्य एकूण १३ रुग्ण आढळले असून उन्हाच्या त्रासामुळे बाधित इतर १९५ रुग्णांची नोंद करण्यात आली आहे.

**तापमानात वाढ** | मराठवाडा विभागात दि. १२ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

**दोन ते तीन अंशांची वाढ** | महाराष्ट्रात १५ मेपर्यंत कमाल तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**रात्रीचे तापमान** | जिल्ह्यात काही ठिकाणी किमान तापमानही सरासरीपेक्षा ३.१ ते ५.० अंश सेल्सिअसने जास्त राहण्याची शक्यता असल्याने रात्रीचा उकाडाही वाढणार आहे.

**नागरिकांसाठी आरोग्य सल्ला** | वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात आणि निर्जलीकरण होण्याचा धोका वाढतो. विशेषतः लहान मुले, वृद्ध व्यक्ती तसेच जुनाट आजार असलेल्या नागरिकांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

## होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत 'आर्य चाणक्यचे यश



तभा वृत्तसेवा

पैठण दि १३ : ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेमध्ये आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर पैठण येथील चि. शिवेंद्र प्रमोद काकडे व चि. सार्थक गणेश फटांगडे या विद्यार्थ्यांनी रौप्यपदक पटकावत नेत्रदीपक यश संपादन केले.

राज्य पातळीवर घेतल्या जाणाऱ्या या स्पर्धा परीक्षेमध्येया वर्षी महाराष्ट्रातील १ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी लेखी परीक्षेच्या पहिल्या फेरीतून १० हजार विद्यार्थी दुसऱ्या प्रात्यक्षिक फेरीसाठी निवडण्यात आले. लेखी परीक्षेतील व प्रात्यक्षिक परीक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे ७५० विद्यार्थ्यांची निवड ही कृती संशोधन प्रकल्प व मुलाखत फेरीसाठी करण्यात आली. सदरील स्पर्धा परीक्षा छत्रपती संभाजीनगर परीक्षा झाली तर मुंबई येथे कृती संशोधन प्रकल्प आणि मुलाखत सादर करण्यात आला.चि. शिवेंद्र काकडे याने *जायकवाडी प्रकल्पावर होणाऱ्या तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा तेथील जैवविविधता, पक्षी अभयारण्य व मासेमारीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे* तर चि. सार्थक फटांगडे याने *पर्यावरणपूरक वीटभट्टी* त्यादृष्टीने सखोल अशी मांडणी करत या दोघांनी विषयावर कृती संशोधन प्रकल्प सादर केला. या विद्यार्थ्यांना त्यांच्या कृती संशोधन प्रकल्पासाठी पक्षी अभ्यासक सुनील पायघन, प्रा. संतोष गव्हाणे,जायकवाडी मच्छीमार बचाव कृती समितीचे अध्यक्ष बजरंग लिंबोरे, वन्यजीव रक्षक तथा पक्षी मित्र डॉ.किशोर पाठक, वसंतराव गोरे , शाळेचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, वर्गशिक्षिका श्रीम.राखी धोकटे, मनोज शिंगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, विद्या सभेचे अध्यक्ष डॉ. जयंत जोशी,स्थानीय व्यवस्था समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल,कार्यवाह जुगलकिशोर लोहिया,शालेय समिती अध्यक्ष शिवाजी मारवाडी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी या दोन विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक व अभिनंदन केले.

## ‘वसुधा’ने फिक्शन रेटिंग्समध्ये मारली बाजी; झी टीव्हीची मालिका देशात अव्वल



छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : भारतीय टेलिव्हिजन क्षेत्रात मोठी उलथापालथ घडवत वसुधा ही मालिका देशातील सर्वाधिक लोकप्रिय फिक्शन मालिकांमध्ये अव्वल ठरली आहे. 1.8 टीव्हीआरची नोंद करत मालिकेने दीर्घकाळ आघाडीवर असलेल्या अनुपमा आणि क्योंकि सास भी कभी बहू थी यांसारख्या मालिकांना मागे टाकले आहे. ताज्या दमाची कथा, वास्तववादी मांडणी आणि वसुधा-देव या व्यक्तिरेखांची प्रभावी सादरीकरणामुळे मालिकेला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या यशामुळे Zee TV ने जनरल एंटरटेनमेंट क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना मंगेश कुलकर्णी यांनी सांगितले की, ‘वसुधा’चे यश हे प्रामाणिक आणि भावनिक कथाकथनाला मिळालेली प्रेक्षकांची पसंती दर्शवते. झी टीव्हीच्या तीन मालिकांनी देशातील टॉप 5 मध्ये स्थान मिळवले असून हे वाहिनीसाठी मोठे यश आहे. प्रेक्षकांसाठी ‘वसुधा’ दररोज रात्री 9.30 वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

## मातृदिनानिमित्त झी टीव्ही कलाकारांचा आईच्या प्रेमाला भावनिक सलाम



छत्रपती संभाजीनगर : मातृदिनानिमित्त झी टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनी आपल्या आईविषयीच्या भावना व्यक्त करत तिच्या प्रेम, त्याग आणि निःस्वार्थ मायेचा गौरव केला. विविध मालिकांमधून प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलेल्या कलाकारांनी आई हीच आयुष्यातील खरी प्रेरणा आणि ताकद असल्याचे सांगितले. ‘गंगा माई की बेटियाँ’मधील अमनदीप सिधू, ‘जाने अनजाने हम मिले’मधील भरत अहलावत आणि ‘तुम से तुम तक’मधील निहारिका चौक्सी यांनी आईच्या आधाराची आणि मायेची आठवण सांगितली. तसेच ‘लक्ष्मी निवास’मधील मानसी जोशी रॉय, ‘सरू’मधील शगुन पांडे, ‘वसुधा’मधील प्रिया ठाकूर आणि ‘जगद्धात्री’मधील सोनाक्षी बत्रा यांनी आईचे प्रेम हे आयुष्यातील सर्वात मोठे बळ असल्याचे नमूद केले. कलाकारांच्या या भावनिक संदेशांमुळे मातृदिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून आईच्या निस्वार्थ प्रेमाला सलाम करण्यात आला.

# गट विकास अधिकारी प्रकाश नाईक यांच्या समितीकडून शिरपूर 23 ग्रामपंचायतींची तपासणी



तभा वृत्तसेवा

**खुलताबाद** | मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय मूल्यमापन समिती खुलताबाद येथील गटविकास अधिकारी प्रकाश नाईक व त्यांच्या टीमने धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे भेट देऊन तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींची तपासणी केली.

या समितीत गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहनाज अन्सारी, कृषी विस्तार अधिकारी आर एफ पाटील, पत्रकार विजय चौधरी यांचा समावेश होता.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शिरपूर तालुक्यात गटविकास अधिकारी प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात आले असून अभियानांतर्गत ग्रामपंचायतींनी केलेल्या कामांची तपासणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद पंचायत समितीच्या मूल्यांकन समितीने शिरपूर तालुक्यातील तपासणी पूर्ण केली आहे.

या अभियानामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली असून गावाचा समृद्ध सर्वांगीण विकास साधण्यात मदत होणार आहे. तसेच तालुक्यातील सहभागी ग्रामपंचायत मध्ये विविध विकास कामांबाबत सकारात्मक स्पर्धा निर्माण झाली आहे. दरम्यान उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतीला तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती शिरपूर पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी आर के गायकवाड यांनी दिली.

शिरपूर तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायतची तालुकास्तरीय मूल्यांकन समितीचे प्रमुख खुलताबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक व त्यांच्या टीम मधील इतर सदस्यांनी शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायत मांडळ, अहिल्यापूर, बळभज, तरडी, खर्द , खर्द पाथर्डे, भटाणे, अर्थे बुद्रुक, जातोडा, उंटावद, खर्द बुद्रुक, सुळे, ला हनुमान, रोहिणी, आंबे, कोराडी, नांदडे, वाठोडा, दुबळ्या, ताजपुरी, असली तांडे या ग्रामपंचायतीची सखोल तपासणी केली. त्यावेळी संबंधित ग्रामपंचायतने स्वयं मूल्यांकन पद्धतीने ऑनलाईन माहिती अपलोड करतेवेळी मिळालेल्या गुणांची प्रत्यक्ष केलेल्या कामांची माहिती संबंधित समिती सदस्यांनी घेतली. ती पाहता त्यांनी शिरपूर तालुक्यातील २३ ग्रामपंचायत मध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मधील प्रत्येक घटक मध्ये शासन परिपत्रकाप्रमाणे अभियानामध्ये आवश्यक सर्व बाबींवर अत्यंत प्रभावी कामकाज केले आहे की नाही याची तपासणी केली आहे.

हे अभियान १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आले आहे. ग्रामपंचायतींनी गावातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला असून विविध विकास कामे लोकसभागातून तसेच श्रमदानातून अनेक विकास कामांना चालना मिळाली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान स्पर्धेसाठी सहभागी झालेल्या ग्रामपंचायतीची तपासणीसाठी आलेल्या मूल्यांकन समितीने आठ गावांना भेट देऊन ग्रामपंचायतचे सर्व रेकॉर्ड अभिलेखे तसेच अभियानातील सर्व निकषनिहाय केलेल्या कामांची पाहणी केली. गावातील नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधा, पाणी योजना, स्मशानभूमी, शाळा, अंगणवाडी, रस्ते, प्राथमिक उपकेंद्र, प्राथमिक केंद्र, जिम, व्यायाम शाळा, वृक्षारोपण, लोकसहभागातून श्रमदानातून केलेली विविध कामे इत्यादी कामांची प्रत्यक्ष पाहणी करून सहभागी गावांचे कौतुक केल्याचे शिरपूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ( पंचायत ) संजय पवार व जितेंद्र पावरा यांनी सांगितले.

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

**जाहिर प्रकटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १००/२०२६

अर्जदार :- १/- पार्वताबाई संतोष साबळे, वय ७७ वर्ष, धंदा शेती, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- गजाजन संतोष साबळे, वय ४० वर्ष, धंदा शेती व नोकरी, रा. वरीलप्रमाणे. ३/- सचिन संतोष साबळे, वय ३६ वर्ष, धंदा शेती व नोकरी, रा. वरीलप्रमाणे. ४/- संगीता रमेश पाटील, वय ४४ वर्ष, धंदा घरकाम, रा. गोंदेगाव, ता. जामनेर, जिल्हा जळगाव. ५/- छाया भगवान टीकारे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. ६/- सुरेखा ज्ञानेश्वर काळे, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. गोरनाळा, ता. जामनेर, जिल्हा जळगाव. ७/- सुमित्राबाई पांडुरंग साबळे, वय ६५ वर्ष, धंदा घरकाम, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. ८/- योगेश पांडुरंग साबळे, वय ३० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ९/- आशा ज्ञानेश्वर पाटील, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. देऊळगाव गुजरी, ता. जामनेर जि. जळगाव. १०/- उषा विनोद इंगळे, वय ३२ वर्ष, धंदा घरकाम, रा. मनुर, ता. बोदवड, जिल्हा जळगाव. ११/- हरी धना साबळे, वय ६५ वर्ष, धंदा शेती, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. १२/- पंढरी धना साबळे, वय ६३ वर्ष, धंदा शेती, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. १३/- सुशिलाबाई शंकर साबळे, वय ५५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. १४/- कुलदीप शंकर साबळे, वय २१ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, १५/- संदीप शंकर साबळे, वय २४ वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे. १६/- भाग्यश्री ईश्वर चौधरी, वय ३७ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. १७/- जनार्धन धनाजी साबळे, वय ५५ वर्ष. धंदा शेती व नोकरी, रा. वरीलप्रमाणे.

-:- विरुद्ध -:-

गैरअर्जदार :-१/- ज्ञानेश्वर धनाजी साबळे, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा. सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत शांताबाई गणा साबळे यांचा दि. रोजी मौजे उमाळा, ता. जळगाव, जि. जळगाव येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते १७ व गैरअर्जदार क्र. १ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते १७ व गैरअर्जदार क्र. १ हे मयत शांताबाई गणा साबळेयांचे भारम असून त्यांना मयत शांताबाई गणा साबळे यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारम प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगा आरोप अमेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध कोल्यापासून ३० दिवसांच्या आत या व्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आश्श्रप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

| आजरोजी दि.९/८/ २०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. 1४/८/२०२६

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री एन. आर. ढोके दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि. की. अर्ज क्र. १६२/२०२६ — पु. ता. १९/०६/२०२६

अर्जदारः- : १- सौ. कमलाबाई पति इंदल जगरवाल वय ६४ वर्षे, धंदा शेती, रा. सिरसगाव ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर. २ - भरतसिंग इंदतमसिंग जगरवाल वय ३७ वर्षे, धंदा शेती, सिरसगाव ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदारः-: निरंक

अर्जः- वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. मयत इंदलसिंग बजरंग जगरवाल हे दिनांक १७/०९/२०२५ रोजी सिरसगाव येथे राहत्या घरी मयत झालेले आहे. अर्जदार क्र. १ व २ यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभघेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार क्रं.. १ व २ हेच मयतास वारस असून वरिल अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. अर्जदार हे मे. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रेत राहत असल्याने सदरील वारस प्रमाणपत्र देण्याचा हक्क व अधिकार मे न्यायालयास आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजरआक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक. ७/०५/२०२६

आदेशावरून

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रस्ता अर्धवट; वाहनधारक, विद्यार्थी आणि नागरिकांचा जीव धोक्यात

## देऊळगाव गात ते डासाळा रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी -डॉ. संजय रोडगे





**सेलू ,/प्रतिनिधी:-** तालुक्यातील देऊळगाव गात ते डासाळा हा महत्त्वाचा रस्ता लोकसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी उखडून ठेवण्यात आला. मात्र, संबंधित कंत्राटदाराकडून अद्यापही रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले नसल्याने वाहनधारक, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अर्धवट अवस्थेत पडून असलेल्या या रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

देऊळगाव गात ते डासाळा हा सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता लोकसभा निवडणुकीपूर्वी मंजूर करण्यात आला होता. जून २०२४ मध्ये या रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली. हा रस्ता दोन वेगवेगळ्या कन्स्ट्रक्शन कंपन्यांना देण्यात आला असून संबंधित कंत्राटदारांकडून मागील अनेक महिन्यांपासून केवळ रस्ता उखडून ठेवण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्ष काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यावरील खड्डे, मुरूम आणि उखडलेली अवस्था यामुळे वाहनधारकांना मोठी कसरत करत प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वारांना विशेषतः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून अनेक किरकोळ अपघात घडत असल्याची माहिती नागरिकांनी दिली. रात्रीच्या वेळी रस्त्यावर कोणतीही सुरक्षिततेची व्यवस्था नसल्याने अपघातांचा धोका आणखी वाढला आहे.

दरम्यान, येत्या १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असून या मार्गावरील लाडनांद्रा, डासाळा, ब्राह्मणवाडी, खवणे पिंपरी, राधे धामणगाव, आष्टी, डोंगरगाव आणि नाथरा पाटी या गावांतील शेकडो विद्यार्थी शिक्षणासाठी सेलू येथे ये-जा करतात. मात्र, रस्त्याचे काम अद्याप अर्धवट अवस्थेत असल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमधून संताप व्यक्त होत आहे. पावसाळा तोंडावर असताना रस्त्याचे काम रखडल्यामुळे चिखल, पाणी साचणे आणि वाहतुकीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी, व्यापारी आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही मोठा फटका बसणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामस्थांनी संबंधित प्रशासन आणि कंत्राटदारावर तीव्र नाराजी व्यक्त करत रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी केली आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी रस्ता पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. याबाबत सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे यांनीही संबंधित प्रशासन व कंत्राटदारांनी देऊळगाव गात ते डासाळा रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करावे, अशी मागणी केली आहे. नागरिक, विद्यार्थी आणि वाहनधारकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा रस्ता पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## स्टेट बँकेसमोरुन मोटारसायकल चोरी, गुन्हा दाखल

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया समोर उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याबाबत गंगाधर आश्रोबा रोडे (वय ४२, रा. नागरजवळा ता. मानवत) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. दि. ५ मे रोजी सकाळी बँकेच्या कामासाठी ते मानवत येथे आले होते. दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास त्यांनी त्यांची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. एम एच २२ ए इ २५७४) स्टेट बँक ऑफ इंडिया समोर उभी करून बँकेत गेले होते.
बँकेचे काम आटोपून बाहेर आल्यानंतर त्यांना मोटारसायकल जागेवर दिसून आली नाही. सुरुवातीला कोणीतरी चुकून वाहन घेऊन गेले असावे असे वाटल्याने त्यांनी बसस्थानक परिसरासह आजूबाजूच्या गावांमध्ये शोध घेतला. मात्र मोटारसायकल मिळून न आल्याने अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची खात्री झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. चोरीस गेलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल काळ्या रंगाची असून त्यावर पांढऱ्या रंगाचे फिकट पट्टे आहेत. या वाहनाची अंदाजे किंमत २० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## जिंतूर-सेलू विधानसभा प्रमुख पदी राम नाना पाटील यांची निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर सेलू विधानसभा प्रमुख पदी राम नाना पाटील यांची निवड जिंतूर सेलू येथील रहिवासी असलेले राम नाना पाटील माजी जिल्हा परिषद गटनेते यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेना जिंतूर सेलू विधानसभा प्रमुख पदी शिवसेना पक्षाचे कार्याध्यक्ष उद्धव साहेब यांनी त्यांची नुकतीच एका पत्रकार द्वारे प्रसिद्धी करून निवड करण्यात आलेल्या मध्ये जिंतूर तालुका प्रमुख किरण देशमुख




उपजिल्हाप्रमुख भारतराव पवार तालुकाप्रमुख रितेश पांडे तसेच शहर प्रमुख अरविंद कटारे शहर संघटक कांतराव धानोरकर यांची निवड करण्यात आली आहे.

त्यांची निवड होताच जिंतूर व सेलू तालुक्यातील चांगला संपर्क असल्यामुळे व शिवसेना पक्षाची बांधील पक्ष वाढीसाठी ते जोमाने काम करतात त्यामुळे पक्षप्रमुख यांनी त्यांची निवड करण्यात आली आहे या निवडीमुळे सेलू तालुक्यातील व जिंतूर तालुक्यातील शिवसैनिकांनी व राम नाना पाटील यांच्या चाहत्यांनी ढोल ताशे व फटाक्यांच्या आतीष बाजी मध्ये त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले यावेळी बोलताना राम नाना म्हणाले की मी गेल्या काही दिवसापासून शिवसेना पक्षाचे काम करीत आहे व ते काम अधिक जोमाने करणार असे त्यांनी स्पष्ट केले आहे या सर्वांचे जिंतूर तालुक्यामध्ये जोरदार स्वागत करण्यात आले व पक्ष वाढीसाठी चांगले काम करण्यात येतील असा विश्वास जनतेतून होत आहे.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने एकास उडवले

**पूर्णा,/प्रतिनिधी :** वाळुची अवैद्य वाहतूक करणाऱ्या भरधाव टिप्परने तालुक्यातील संदलापूरच्या गावच्या महिला सरपंचांच्या पतीला जोरदार धडक दिल्याची घटना मंगळवारी घडली असून, या घटनेत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी संबंधित टिप्परला आग लावून पेटवून दिल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणत चालकाला ताब्यात घेतले असून गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान बुधवारी मयताच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

पंडित बाळासाहेब म्हात्रे (वय ५५) रा. संदलापुर ता. पुर्णा असं त्या महिला सरपंचांच्या मयत पतीचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या दरम्यान संदलापूर गावाजवळील पूर्णा नदीपात्रातून रेती भरून टिप्पर क्र. (एम.एच ४३ / यू / २८५०) हा गावामधून भरधाव वेगाने येत होता

पंडित बाळासाहेब म्हात्रे यांना टिप्परने जोरदार धडक दिली धडक इतकी भीषण होती की रस्त्याच्या बाजूने जात असलेल्या पंडित म्हात्रे यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच संतप्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. संतापाच्या भरात ग्रामस्थांनी अपघातग्रस्त टिप्परला आग लावून पेटवून दिले. या आगीत टिप्परची केबिन जळाले आहे. यानंतर परिसरात काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. ही घटना समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ समाधान पाटील, पोलीस निरीक्षक विलास गोबाडे तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत टिप्पर चालकाला ताब्यात घेतले. मृत पंडित मात्रे यांचा मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालय, परभणी येथे पाठविण्यात आला होते. दरम्यान, घटनेनंतर संदलापूर गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान बुधवारी मयताच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

## गरजू व पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही-कृषी अधिकारी घुगे

**जिंतूर,/प्रतिनिधी:** :तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक अडीअडचणी, शंका आणि तांत्रिक मार्गदर्शनासाठी आता भटकंती करावी लागणार नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यासाठी जिंतूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने एक विशेष पाऊल उचलले असून, दररोज कार्यालयात कृषी सेवकांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. याबाबतचे अधिकृत आदेश तालुका कृषी अधिकारी एन.जी. घुगे यांनी निर्गमित केले आहेत.

तालुक्यातील अनेक शेतकरी मार्गदर्शनासाठी तालुका कार्यालयात चकरा मारतात, मात्र अनेकदा क्षेत्रीय कर्मचारी किंवा अधिकारी गावात दौऱ्यावर असल्याने त्यांची भेट होत नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन होण्यास अडचणी येत होत्या.या बाबीची गंभीर दखल घेत तालुका कृषी कार्यालयाने आता महिनाभराचे नियोजन जाहीर केले आहे. नवीन आदेशानुसार, दर महिन्याच्या १ ते ३१ तारखेपर्यंत प्रत्येक दिवसासाठी स्वतंत्र कृषी सेवकाची ड्युटी लावण्यात आली आहे. हे नियुक्त कर्मचारी



कार्यालयीन वेळेत पूर्ण दिवस जिंतूर येथील कार्यालयात हजर राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील. शासकीय सुट्टीचे दिवस वगळता हे कामकाज नियमितपणे सुरू राहणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना नेमक्या कोणत्या दिवशी कोणता कर्मचारी उपलब्ध असेल, याची स्पष्ट माहिती मिळणार आहे. तालुका कृषी अधिकारी एन.जी. घुगे यांनी या आदेशात स्पष्ट केले आहे की, जर नियुक्त कर्मचाऱ्याने या आदेशाचे उल्लंघन केले किंवा कामात दुर्लक्ष केले, तर त्याला जबाबदार धरून संबंधित कर्मचाऱ्यावर कडक प्रशासकीय कारवाई केली जाईल. या नवीन व्यवस्थेमुळे जिंतूर तालुक्यातील शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या कृषी विषयक तक्रारींचे निवारण जलद गतीने होण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांचे हित हेच आमचे मुख्य ध्येय आहे. तालुक्यातील एकही गरजू शेतकरी योजनांपासून वंचित राहू नये यासाठी आमची संपूर्ण टीम मुख्यालयात राहून आणि फिल्डवर जाऊन काम करत आहे.'' - तालुका कृषी अधिकारी, जिंतूर.

## एस टी कामगार सेनेच्या राज्य चिटणीसपदी मदन मुंडे यांची निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी:** एस टी कामगार सेनेच्या राज्य चिटणीसपदी मदन मुंडे यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र एस टी कामगार सेनेचा वर्धापन दिन दि. १० मे २०२६ रोजी शिवसेना नेते, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार अरविंद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात एस टी कामगार सेनेची नवीन राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यावेळी एस टी कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सातत्याने आवाज उठवून कर्मचारी प्रश्नांसाठी लढा देणारे जिंतूर आगारातील लिपिक मदन मुंडे यांची एस टी कामगार सेनेच्या ''राज्य चिटणीस'' पदी निवड करण्यात आली. ही निवड



सरचिटणीस हिरेन रेडकर व कार्याध्यक्ष प्रदीप धुरंदर यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आली. मदन मुंडे यांनी एस टी कर्मचारी संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग घेत अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या निवडीमुळे जिंतूर आगारासह संपूर्ण परभणी जिल्ह्यातील एस टी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीबद्दल खासदार ओमराजे लिंबाळकर, जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील, विभागीय अध्यक्ष सुदर्शन जाधव, सचिव अशोक म्हेत्रे, दादा घोडके, राहुल गिराम, आण्णा जाधव, विजय मुंडे, भिमा खोत, संतोष डोरले, उत्रेश्वर डिसले यांच्यासह असंख्य कर्मचारी बांधवांनी आनंदोत्सव साजरा करून मदन मुंडे यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात एस टी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली असून संघटना भविष्यात अधिक ताकदीने कर्मचारी हितासाठी काम करणार असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त...

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन सर्वसामान्यांमध्ये घबराट निर्माण करणारे : अजय गव्हाणे यांचा आरोप

**परभणी,/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेल या इंधनाच्या बचतीसह सोने खरेदी करु नका असे केलेले आवाहन हे सर्वसामान्य नागरीकात घबराट निर्माण करणारे ठरले आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे यांनी व्यक्त केले.

पेट्रोल-डिझेल या इंधनाच्या टंचाईवर सर्वार्थाने मात कशी करता येईल या दृष्टीने नियोजन करण्याऐवजी पंतप्रधान मोदी यांनी इंधन बचतीचा, दौऱ्यांवर निर्बंध टाकण्याचा दिलेला सल्ला पूर्णतः हास्यास्पद आहे. असे गव्हाणे यांनी नमूद करीत लग्नसराईसह अन्य सणासुदीच्या काळात ग्रामीण भागापासून शहरांमधून सोने खरेदी महत्वपूर्ण बाब ठरली असतांना सोनं खरेदी करु नका, या संबंधी केलेले आवाहन सर्वसामान्य नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणारे आहे, असे मत गव्हाणे यांनी व्यक्त केले.
राज्य व केंद्र सरकार हे सर्व आघाड्यांवर सपशेल अपयशी ठरले आहे, असाही आरोप गव्हाणे यांनी केला.

### गजानन नगरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त गजानन नगरातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक येथे गुरुवार १४ मे रोजी अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड यांनी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जीवनकार्य, शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानी इतिहासावर सविस्तर प्रकाश टाकला. मराठा समन्वयक बालाजी मोहिते यांनी प्रस्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. टी. पोळ होते. कार्यक्रमास दिलीप गिराम, पंडितराव शिंदे, सुभाष जाधव, रमेश देशमुख, डॉ. विजय बोंडे, गजानन घाडगे, सुनील जाधव, स्वामी आप्पा, रामेश्वर शिंदे, राजेश जाधव, बाळासाहेब चव्हाण, सुधाकर गायकवाड, बी. एम. जाधव सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड, मराठा सेवा मंडळाचे अध्यक्ष नितीन देशमुख आणि मराठा समन्वयक बालाजी मोहिते यांनी केले होते. आभार प्रदर्शन नितीन देशमुख यांनी केले.

### परभणीत पुनर्विवाह जनजागृती अभियानाची तयारी सुरू : १५ मे ते २५ जूनदरम्यान जिल्हाभर जनजागृती; पुनर्विवाह नोंदणी व वधू-वर परिचय मेळाव्यांची माहिती देणार

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठा प्रवाह समन्वय समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुनर्विवाह जनजागृती अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हा कार्यकारिणीची बैठक परभणी येथे उत्साहात पार पडली. १५ मे २०२६ ते २५ जून २०२६ या कालावधीत परभणी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शहरासह ग्रामीण भागात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या मराठा प्रवाह समन्वय समितीच्या माध्यमातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. येथील विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत अभियानाची रूपरेषा जाहीर करण्यात आली. यावेळी धाराजी भुसारे यांनी अभियानाविषयी सविस्तर माहिती दिली. जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात पुनर्विवाहाची गरज, पुनर्विवाह नोंदणी प्रक्रिया तसेच पुनर्विवाह वधू-वर परिचय मेळाव्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुनर्विवाह नोंदणी विनामूल्य करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

बैठकीत तालुका कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या-आपल्या तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत मनोगत व्यक्त केले. या अभियानात सहभागी होण्यासाठी अथवा पुनर्विवाह नोंदणीसाठी मराठा प्रवाह समन्वय समिती कार्यालय, जिल्हा विशेष लेखा परीक्षण कार्यालयासमोर, शिवाजीनगर, परभणी येथे संपर्क साधावा किंवा ९८२३१२५२२७, ८००७५८६१०२, ८६९८३८९०५४ या क्रमांकांवर संपर्क करण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिंतूर-सेलू विधानसभा प्रमुखपदी राम नाना पाटील यांची निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी :** शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिंतूर-सेलू विधानसभा प्रमुखपदी राम नाना पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या वतीने ही निवड जाहीर करण्यात आली. यासोबतच जिंतूर तालुकाप्रमुखपदी किरण देशमुख, उपजिल्हाप्रमुखपदी भारतराव पवार, तालुकाप्रमुखपदी रितेश पांडे, शहरप्रमुखपदी अरविंद कटारे तसेच शहर संघटकपदी कांतराव धानोरकर यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

राम नाना पाटील यांचा जिंतूर व सेलू तालुक्यात मोठा जनसंपर्क असून पक्षवाढीसाठी ते सातत्याने कार्यरत असल्याने पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. निवडीची घोषणा होताच जिंतूर व सेलू तालुक्यातील शिवसैनिक आणि समर्थकांनी ढोल-ताशांच्या गजरात तसेच फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोषात स्वागत केले.

यावेळी बोलताना राम नाना पाटील यांनी, आपण गेल्या अनेक दिवसांपासून शिवसेना पक्षाचे काम करत असून आगामी काळातही पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी जोमाने कार्य करणार आहे, असे सांगितले. या सर्व नियुक्त्यांमुळे जिंतूर व सेलू तालुक्यात शिवसेनेला बळ मिळणार असल्याचा विश्वास कार्यकर्ते व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

### ज्येष्ठ नागरीक श्रीमती पद्मावतीबाई शंकरलाल मंत्री यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील स्टेशनरोड भागातील ज्येष्ठ नागरीक श्रीमती पद्मावतीबाई शंकरलालजी मंत्री यांचे गुरुवारी दुपारी वृध्दापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, नातवंडे, असो मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर शुक्रवार १५ मे रोजी सकाळी ९ वाजता जिंतूर रस्त्यावरील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पूर्वी रेल्वेस्थानक भागातील निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघणार आहे. दरम्यान, श्रीमती पद्मावतीबाई मंत्री या गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष आणि महेश अर्बन को.ऑप बँकेचे माजी अध्यक्ष डॉ. किशोर मंत्री, डॉ. विनोद मंत्री व कैलास मंत्री यांच्या मातोश्री होत.

## अग्रलेख...

# एकदाचं सगळं ‘नीट’ करा हो...!

देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ज्या परीक्षेवर अवलंबून असते, ती ‘नीट’ परीक्षा अजिबातच नीट राहिली नाही. आता ती पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ही परीक्षा घेणाऱ्या ‘नॅशनल टेस्टिंग एजन्सी’च्या (एनटीए) विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना दुसऱ्यांदा घडली आहे. ३ मे २०२६ रोजी झालेली ही परीक्षा रद्द करून सरकारने सीबीआयला चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना, पालकांना मानसिक धक्का बसला आहे. अनावश्यक ताण निर्माण झालेला आहे. सकृद्दर्शनी परीक्षा रद्द होणे धक्कादायक असले, तरी पेपरफुटीची पृष्ठभूमी पाहता अशा निर्णयाची गरज एकदम नाकारता येण्याजोगी नाही हेही खरेच. मात्र, दोन वर्षांचे परिश्रम कामाला येतील, अशी अपेक्षा असतानाच तीच परीक्षा पुन्हा द्यावी लागेल, हा विचारच विद्यार्थ्यांसाठी खूप वेदनादायी आहे, हेही मान्य केले पाहिजे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या अशा परीक्षेत वारंवार पेपरफुटीचे आणि गैरव्यवहाराचे प्रकार घडत असतील, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने पुढे तयारी करावी, हा फार गंभीर प्रश्न आहे. हे खरे की, विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करावा लागणार नाही, परीक्षा शुल्क भरावे लागणार नाही. पण त्यांना बसलेल्या मानसिक धक्क्याचे आणि त्यांच्या वाट्याला आलेल्या ताणाचे काय? पेपर फोडणाऱ्यांना ही गोष्ट कळणार नाही. तब्बल २३ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य अशा प्रश्नपत्रिकांच्या लिलावावर अवलंबून असते, तेव्हा ते व्यवस्थेचे नैतिक पतन असते. त्यामुळेच नीट परीक्षा रद्द झाली खरी; सोबतच लाखो मध्यमवर्गीय, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांचा विश्वासही ढळला, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

पेपरफुटीचे धागेदोरे लातूर, नाशिक, पुणे आणि थेट राजस्थानपर्यंत पोहोचले आहेत. नाशिकमधील ‘गेस पेपर’ आणि मूळ प्रश्नपत्रिका यांतील कमालीचे साधर्म्य थक्क करणारे आहे. अगदी स्वल्प विराम आणि पूर्ण विरामासह प्रश्न जसेच्या तसे येणे हा केवळ योगायोग असू शकत नाही. तो सुनियोजित हेराफेरीचा भागच असावा. राजस्थान पोलिसांनी जप्त केलेल्या ४९० प्रश्नांच्या ‘गेस पेपर’मधील तब्बल ५७५ गुणांचे प्रश्न जसेच्या तसे परीक्षेला आले, हे धक्कादायकच. २०१९ मध्ये ‘एनटीए’कडे या परीक्षेची धुरा आली तेव्हापासूनच अशा लहान-मोठ्या गोंधळाची मालिका सुरू आहे. २०२४ मध्ये पाटण्यात ३० ते ५० लाख रुपयांमध्ये नीट परीक्षेचे पेपर विकले गेले. गुजरातमध्ये शिक्षकांनीच पैसे घेऊन ‘ओएमआर’ शीट भरून देण्याचे काम केले तर सवाई माधोपूरमध्ये चुकीच्या प्रश्नपत्रिकांचे वाटप झाले होते. २०२४ च्या निकालात ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले होते. गणितीयदृष्ट्या अशक्य असलेले ७१८ आणि ७१९ गुणही विद्यार्थ्यांना बहाल केले गेले; जे सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर मागे घ्यावे लागले. मात्र, २०२४ च्या या कटू अनुभवातून ‘एनटीए’ने काहीच धडा घेतला नाही, हे यंदाच्या पेपरफुटीने सिद्ध केले आहे. पुन्हा एकदा तीच ‘मोडस ऑपरेंडी’ तसेच ‘रॅकेट’ आणि विद्यार्थ्यांचा तोच संताप समोर आला आहे. १० ते २५ लाख रुपयांत प्रश्नपत्रिकेची एक प्रत विकली जाते, हे ऐकून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या पायाखालची जमीन सरकते आणि डोक्याचा भुगा होतो.

ज्या देशात डॉक्टर बनण्याची पात्रता ज्ञानावर नाही तर पैशाच्या जोरावर ठरवली जाते, त्या देशाचे आरोग्य धोक्यात असते, हे समजून घेतले पाहिजे. आपल्या देशात वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील विद्यार्थीही बघतात. मोजक्या भाग्यवंतांना शासकीय महाविद्यालयांत संधीही मिळते. एरवी वैद्यकीय शिक्षणाच्या भव्य दुकानदारीवर आणि डोनेशनवर ठरणाऱ्या प्रवेशांवर भरपूर बोलले-लिहिले गेलेच आहे. दोन-दोन, तीन-तीन वर्षे रात्रंदिवस अभ्यास करून, ‘कोचिंग क्लास’चे अवाढव्य शुल्क भरून विद्यार्थी या परीक्षेला सामोरे जातात. मेहनतीने गुण मिळवतात. तरीही बऱ्याच लोकांच्या वाट्याला निराशा येते. कारण ‘मॅनेजमेंट कोटा’ आणि अवाढव्य ‘डोनेशन’च्या नावाखाली पात्र नसलेले विद्यार्थी त्यांच्या जागा बळकावतात. आता ‘पेपरफुटी’चा नवा राक्षसही सामान्य-गरिबांच्या स्वप्नांची राखरांगोळी करण्यासाठी तयार झाला आहे. अशा स्थितीत ज्यांच्याकडे केवळ बुद्धिमत्ता आणि कष्टाची तयारी आहे, अशा होतकरू विद्यार्थ्यांचे काय? खरी पात्रता असलेला विद्यार्थी मागे पडतो आणि ज्यांची लायकी नाही, पण लाखो रुपये फेकायची ताकद आहे, असा अपात्र उमेदवार डॉक्टर होतो. ही समाजाच्या आरोग्याशी केलेली प्रतारणाच आहे.

देशभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त करीत आहेत. त्यांचा आक्रोश रास्त आहे. कारण विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्याच तणावातून जावे लागणार आहे. पुन्हा प्रवासाचा भुर्दंड बसणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, ज्या विद्यार्थ्यांचा पेपर यावेळी चांगला गेला होता आणि पुढे समजा कमनशिबाने तो चांगला गेला नाही, तर त्याला जबाबदार कोण असेल? नाशिकमधून पकडल्या गेलेला शुभम किंवा राजस्थानातील मनीष ही केवळ प्यादी आहेत. यामागे मोठे अर्थकारण आणि शिक्षण ‘माफिया’ कार्यरत आहेत. नाशिकच्या इंदिरानगर पोलिसांपासून ते राजस्थानातील ‘स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप’पर्यंतच्या अनेक यंत्रणा या तपासात गुंतल्या आहेत. जे काही समोर येत आहे, ते केवळ हिमनगाचे टोक आहे. कोचिंग क्लासेस, दलाल आणि तांत्रिक तज्ज्ञांच्या संगनमताने चालणारी ही टोळी जोपर्यंत मुळासकट नष्ट केली जात नाही, तोपर्यंत परीक्षा पारदर्शी होणे नाही. वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया ही नुसती कठोर नव्हे तर निर्दोष आणि पारदर्शक असली पाहिजे. अतिशय महत्त्वाच्या या परीक्षेचा पेपर फुटतो ही बाब गंभीर आहेच; त्याहून भयावह हे की, ‘एनटीए’ने इतिहासातून काहीच धडा घेतला नाही. त्यामुळे या यंत्रणेच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल आवश्यक आहे. ‘जीपीएस ट्रॅकिंग’, ‘बायोमेट्रिक’ पडताळणी आणि ‘एआय’ आधारित देखरेख असतानाही पेपर फुटतोच कसा? व्यवस्थेतील लोक यात सामील असण्याची दाट शक्यता आहे. अशा संस्थांमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांना आणि म्होरक्यांना आजन्म कारागृहात पाठविले जात नाही, तोपर्यंत हे चक्र थांबणार नाही. ते वारंवार असे करीत राहतील. आता केवळ चौकशी समित्या नेमून चालणार नाही तर ‘अँटी-पेपर लीक’ कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. पेपर फोडणाऱ्यांना आणि विकत घेणाऱ्यांना मोठा धाक निर्माण होणे गरजेचे आहे. पेपरफुटीला देशद्रोहाइतकाच गंभीर गुन्हा मानून संबंधित गुन्हेगारांच्या मालमत्ता जप्त करणे आणि त्यांना जन्मठेपेसारखी शिक्षा देण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. खाजगी शिकवण्यांच्या हस्तक्षेपावरही लगाम घालणे गरजेचे आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हे खरे. पण आज हेच दूध माफियांच्या घशात जात आहे. आता विद्यार्थ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये. केवळ मलमपट्टी न करता, या सडक्या व्यवस्थेवर ‘मेजर सर्जरी’ करण्याची वेळ आली आहे. अन्यथा, गुणवत्ता मरेल आणि केवळ पदव्या धारण केलेल्या पण कौशल्य नसलेल्यांची गर्दी तेवढी दिसेल. भावी डॉक्टरांच्या हाती अशा भ्रष्ट व्यवस्थेने ‘स्टेथोस्कोप’ दिला, तर तो या समाजाच्या नाडीचा ठोका नक्की चुकवेल. प्रश्न २३ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आहे.

देशाच्या नैतिकतेचा व प्रतिमेचाही आहे. एखाद्या संस्थेचे नाव बदनाम झाले, तर अवघ्या जगात त्या संस्थेने प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांना समोर उभे केले जात नाही. नागपूर विद्यापीठातील कोहचाडे प्रकरण याचे चांगले उदाहरण. त्या प्रकरणानंतर बरीच वर्षे या विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडे संशयाने बघितले जात होते. ‘एनटीए’नेही आजवर आपली अक्षमता वारंवार सिद्ध केली आहे. त्यामुळे सरकारने या संस्थेची पुनर्रचना करावी किंवा पर्यायी व्यवस्था निर्माण करावी. प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील अश्रू हे व्यवस्थेच्या अपयशाचे पुरावे आहेत, हे समजून घेतले पाहिजे. ‘नीट’चे एकदाचे आणि कायमचे सगळे नीट केले पाहिजे. तरच या परीक्षेची विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित राहील.

## प्रासंगिक

# जीवनोत्सवाची शिकवण देणारे गुरुदेव

**नंदिनी निखिल गडकरी**

**आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांचा १३ मे रोजी जन्मदिवस होता. त्यानिमित्त...**



काही माणसे आपल्या आयुष्यात शांतपणे येतात, पण आपल्या मनावर आणि आत्म्यावर चिरस्थायी ठसा उमटवतात. माझ्यासाठी, गुरुदेव श्री श्री रविशंकर यांना भेटणे आणि ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’शी ओळख होणे हा अनोखा अनुभव होता. आर्ट ऑफ लिव्हिंगने जगभरातील आपल्या कार्याची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत. या काळात या माध्यमातून कोट्यवधी लोकांना जीवनाचा खरा आनंद आणि अर्थ कळलेला आहे.

अगदी लहान वयात ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’शी जोडले जाणे, हा माझ्यासाठी सर्वात मोठा आशीर्वाद आहे. गुरुजींच्या शिकवणीने आणि त्यांच्या दिव्य कृपेने दैनंदिन जीवनातील चिंता कमी करण्यास मदत केली. मला असे वाटते की, गुरुजी हीच माझी सावली आहे आणि म्हणूनच ते प्रत्येक वेळी माझ्यासोबत असतात.

इयत्ता तिसरीत असताना माझ्या आजीकडून मला ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’बद्दल कळले आणि त्यानंतर, २०२१ मध्ये लॉकडाऊन संपल्यावर, मी पहिल्यांदा बंगळुरु येथील आंतरराष्ट्रीय ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’ केंद्राला भेट दिली. तेव्हापासून, तिथे अनुभवलेली आपुलकी, शांती आणि आनंद माझ्यासोबत कायमचे राहिले आहेत. गुरुदेवांच्या शिकवणीतून, मी दयाळूपणाचे महत्त्व, तणाव देणाऱ्या किंवा विचार करण्यायोग्य नसलेल्या गोष्टी कशा सोडून द्याव्यात हे शिकले आहे. ते म्हणतात की, जीवन हा एक उत्सव आहे. त्याचा आनंद मिळवत राहिले पाहिजे. संकटांची, अडचणींची फार चिंता करू नये.

मी दरवर्षी त्यांच्या आश्रमाला भेट देते. कारण ते माझे दुसरे घर आहे. संगीता जानी दीदींसारख्या गुरुदेवांच्या अनेक अद्भुत शिष्यांची भेट घेण्याचे भाग्य मला लाभले. त्या म्हणतात, गुरू आपल्याला शोधून काढतात आणि आपल्या सोबत असतात. दुसऱ्या आहेत हेतल आंटी, ज्यांनी ‘सुदर्शन क्रिया’ ही दिव्य क्रिया शिकवली. त्यांच्या स्नेह आणि प्रोत्साहनामुळे मला नेहमी सुरक्षित आणि प्रेरित वाटले. त्यांच्या मायेने आणि वात्सल्याने माझ्या हृदयात जागा निर्माण केली आहे. त्यामुळेच माझे आश्रमातील वास्तव्य अविस्मरणीय बनले. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त मी त्यांना वंदन करते. त्यांच्या ज्ञानाने, करुणेने आणि त्यांच्या दिव्य दृष्टीने माझ्यासह असंख्य जिवांना आशीर्वाद दिल्याबद्दल सर्वशक्तिमान परमेश्वराप्रति कृतज्ञता व्यक्त करते. त्यांची शिकवण आणि निरपेक्ष प्रेम जगभरातील लोकांना मधुर सत्संगासह सात्त्विक जीवनशैलीचा अवलंब करण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा आणि धैर्य देत आहे. गुरुदेवांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सतत मिळो, त्यांचे कार्य अविरत सुरू राहो आणि जगात सर्वत्र आनंद व शांतता नांदो, एवढेच परमेश्वराला मागणे.

॥ जय गुरुदेव ॥

## वेध

**नीलेश जोशी**

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्या चिंताजनक

जगातील सर्वात तरुण देश अशी भारताची ओळख. आपल्या देशातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ६५ टक्के लोकसंख्येचे वय ३५ वर्षांपेक्षा कमी तर देशाचे सरासरी वय केवळ २९ वर्षे इतके आहे. एकीकडे जागतिक स्तरावर ही अभिमानास्पद बाब असली, तरी दुसरीकडे देशांतर्गत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये सातत्याने होणारी वाढ ही सामाजिक चिंता वाढविणारी आहे. नुकताच राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाने ‘अपघाती मृत्यू आणि आत्महत्या-२०२४’ हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे वाढत असलेले प्रमाण चिंताजनक आहे. या आकडेवारीनुसार देशात २०२० साली १२ हजार ५५६ इतक्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. देशात झालेल्या एकूण आत्महत्यांच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची टक्केवारी ८.२ इतकी होती. २०२१ साली १३ हजार ८९, २०२२ साली १३ हजार ४४, २०२३ साली १३ हजार ८९२ तर २०२४ साली १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद या अहवालात आहे. २०२४ साली एकूण आत्महत्येच्या तुलनेत ८.५ टक्के इतक्या आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. ही आकडेवारी निश्चितच दुर्दैवी म्हणावी लागेल. त्यातही विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची सर्वाधिक १९०९ घटना महाराष्ट्रात झाल्याचे या अहवालातील आकडेवारीवरून दिसून येते. महाराष्ट्राखालोखाल उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू यांचा क्रम लागतो.

विद्यार्थी आत्महत्यांपैकी जवळपास ४३ टक्के आत्महत्या या ४ राज्यात घडल्याचे दिसून येते. नुकताच दहावीचा निकाल लागला. या निकालात बहुतांश विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले तर काहींना अपेक्षित यश गाठता आले नाही. अकोला जिल्ह्यातील एका घटनेमुळे आता यशाची व्याख्या कळेनाशी झाली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला ६७ टक्के मिळाले. खरं म्हणजे ही टक्केवारी प्रथम श्रेणीची पण या विद्यार्थ्याने निकालानंतर एका जलाशयात उडी मारून आत्महत्या केली. मोबाईलवरील स्टेटसमुळे त्याला अपेक्षित यश न मिळाल्याने त्याने आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे पुन्हा एकदा यश-अपयश, ज्ञान प्राप्ती- शिक्षण या सर्व बाबीचे समीक्षण आणि विद्यार्थ्यांचे समुदेशन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

शिक्षण हे आता ज्ञानप्राप्तीचे साधन राहिले नसून ते आता स्पर्धेचा आखाडा झाल्याचे चित्र आहे. अगदी शिशू अवस्थेपासून शाळा (कॉन्व्हेंट), शिकवणी, एक्स्ट्रा क्लास, विशेष वर्ग (अदर ॲक्टिव्हिटी) या चक्रात विद्यार्थी अडकतो अन् मग उरते ती केवळ मार्क आणि टक्केवारीची स्पर्धा. यातूनच आत्महत्येसारखी समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर येत आहे. वास्तविक इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, वाङ्मय अशा क्षेत्रातही उत्तम ज्ञान, संधी आहेत. देशाच्या विकासात प्राध्यापक, संशोधक, तज्ज्ञ आदींनी या विषयाद्वारे महत्त्वपूर्ण भूमिका वठविली आहे. या विषयासह विविध विषयांचे ज्ञान असणाऱ्यांची गरज भविष्यातही आहेच. दुर्दैवाने पालक आणि विद्यार्थी केवळ स्पर्धा परीक्षा, इंजिनीअरिंग, वैद्यकीय क्षेत्र यालाच भविष्य समजू लागले.

यातच जीवनाचे सार्थक आहे. या कल्पनेच्या बाहेर विद्यार्थी जाऊ शकत नसल्याने विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था विचित्र होत आहे. अनेकदा स्वतःतील न्यूनगंड वाढतो. ‘मी मागे पडतोय’ ही भावना मानसिक तणाव वाढवते. वास्तविक एका परीक्षेतील अपयश म्हणजे आयुष्याचा शेवट हा कधीच असू शकत नाही. पण दुर्दैवी घटनांमध्ये सतत होणारी वाढ ही भयावह आहे. आत्महत्येचा विचार सुरू असणाऱ्याच्या मनात प्रचंड द्वंद्व सुरू असतं, आत्महत्येचा विचार केवळ निकोप संवादातून दूर सारला जाऊ शकतो, असेही असे तज्ज्ञांचे मत आहे. खरं म्हणजे मनमोकळा संवाद हा भारतीय कुटुंब व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. दुर्दैवाने गत काही वर्षात कुटुंबातील संवाद कमी होत असल्याचे दिसून येते. याची अनेकानेक कारणे असली तरी कुटुंबातील निकोप संवाद वाढणे, अधिक दृढ होणे हे विद्यार्थी आत्महत्येसह विविध समस्यांच्या निराकरणासाठी आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# रालोआ मजबूत, इंडिया आघाडी कमजोर

**श्यामकांत जहागीरदार**

केरळ, आसाम, पुडुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाने नेमके काय झाले, याचे उत्तर भाजपाच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी अधिक मजबूत झाली, तर काँग्रेसच्या नेतृत्वातील विरोधकांची इंडिया आघाडी आणखी कमजोर झाली, असे म्हणावे लागेल. आसाम आणि पुडुचेरीत भाजपा आणि भाजपाच्या मित्रपक्षांची सत्ता होती; त्यात आता पश्चिम बंगालची भर पडली आहे. या पाच राज्यातील कुठेही काँग्रेसची सत्ता नव्हती, पण काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडीला केरळमध्ये बहुमत मिळाले. काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यात एकने वाढ झाली. त्यामुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी आपल्या हाताने आपली पाठ थोपटून घ्यायला हरकत नाही. केरळमधील काँग्रेसच्या विजयात राहुल गांधी यांचा ‘हात’ किती आहे, हा खरं म्हणजे संशोधनाचाच विषय आहे. २०१९ च्या लोकसभेत राहुल गांधी केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते. २०२४ ची लोकसभा निवडणूकही ते रायबरेलीसोबत वायनाडमधून जिंकले; नंतर त्यांनी रायबरेली कायम ठेवत वायनाडचा राजीनामा दिला. त्यामुळे वायनाड मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत प्रियांका वढेरा जिंकल्या आहेत. केरळमधील युडीएफच्या विजयात गांधी घराण्याचा एवढाच बादरायण संबंध म्हणायला हरकत नाही.

तामिळनाडूत चित्रपट अभिनेते विजय यांच्या पक्षाने सर्वाधिक म्हणजे १०८ जागा जिंकल्या. २३४ सदस्यांच्या तामिळनाडू विधानसभेत बहुमतासाठी ११८ जागांची आवश्यकता होती. त्यामुळे विजय यांच्या तमिळगा वैत्ती कळगम (टीव्हीके) या पक्षाला बहुमतासाठी १० जागा कमी पडल्या. अशा वेळी कधी नव्हे ती चपळाई दाखवत काँग्रेसने विजय यांच्या पक्षाला पाठिंबा जाहीर केला. काँग्रेसने या निवडणुकीत खूप जास्त जागा जिंकल्या असेही नाही; त्या पक्षाला फक्त ५ जागा मिळाल्या. या पाच जागाही काँग्रेसला राज्यात स्वतःच्या ताकदीवर जिंकता आल्या नाही. त्यासाठी द्रमुकच्या कुबड्या धराव्या लागल्या. पण सत्तेच्या वितभर तुकड्यासाठी काँग्रेसने दीर्घकाळपासून राज्यात द्रमुकशी असलेली आपली सोयरिक मोडली. यातून काँग्रेसला तात्कालिक लाभ झाल्यासारखे दिसत असले, तरी दीर्घकालीन नुकसान झाले आहे. टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेताना काँग्रेसने आपला मित्रपक्ष असलेल्या द्रमुकला विश्वासात घ्यायला हवे होते; पण काँग्रेसने तसे केले नाही. द्रमुकला अंधारात ठेवून टीव्हीकेला पाठिंबा जाहीर करीत काँग्रेसने एकप्रकारे द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला, असे म्हणायला हरकत नाही. राज्यात विजय यांच्या नेतृत्वातील सरकारला पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसच्या दिल्लीतील नेतृत्वाने माकप आणि भाकप अशा डाव्या पक्षाच्या नेत्यांना दूरध्वनी करीत त्यांचेही मन वळवले. पण काँग्रेस नेत्यांच्या या भूमिकेमुळे द्रमुक नेते दुखावले गेले. त्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले. द्रमुक नेत्या कनिमोझी यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना पत्र लिहीत आपल्या पक्षाच्या खासदारांसाठी सभागृहात बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी केली. सध्या द्रमुक हा काँग्रेसचा मित्रपक्ष आणि इंडिया आघाडीचा घटक पक्ष म्हणून लोकसभेत विरोधी पक्षांच्या बाजूला काँग्रेससोबतच बसतो. कनिमोझी





यांच्या अशा पत्रामुळे द्रमुक आता विरोधी आघाडीतून बाहेर पडल्याचे दिसते आहे. द्रमुकने आतापर्यंत लोकसभेत सरकारविरोधी सर्वच मुद्द्यांवर काँग्रेसला सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. द्रमुकचे लोकसभेत २२ तर राज्यसभेत ८ खासदार आहेत. यावरून द्रमुकचे ३० खासदार इंडिया आघाडीतून बाहेर पडले तर इंडिया आघाडीची काय स्थिती होईल, याची कल्पना करता येते. लोकसभेत महिला आरक्षणासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक फेटाळले गेले. त्यात एकसंध इंडिया आघाडीचा मोठा सहभाग होता. त्यामुळे तामिळनाडूत सरकार स्थापन करण्यासाठी टीव्हीके पक्षाला पाठिंबा देत आपण मोठी चूक केली, याचा अनुभव लवकरच काँग्रेसला आल्याशिवाय राहणार नाही. त्यावेळी काँग्रेसची स्थिती गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले, अशी होणार आहे. टीव्हीकेसोबत सत्तेत राहता येणार नाही आणि द्रमुकसारखा जुना आणि विश्वासू मित्र पक्ष गमावला, अशी काँग्रेसची स्थिती होणार आहे.

भाजपा आपला वैचारिक विरोधक असल्याचा दावा राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री विजय सध्या करत असले, तरी त्यांना आपली भाजपा विरोधांची भूमिका फार काळ रेटून नेता येणार नाही. राज्यातील आपले सरकार चालवण्यासाठी त्यांना केंद्रातील मोदी सरकारचे सहकार्य आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या सहकार्याशिवाय विजय यांना राज्यातील आपले सरकार दीर्घकाळ चालवता येणार नाही, ही दगडावरची रेष आहे. राजकीय शहाणपणा दाखवत टीव्हीकेने केंद्रातील भाजपाच्या सरकारशी जुळवून घेण्याची भूमिका घेतली तर त्या सरकारला पाठिंबा दिलेल्या वा सरकारमध्ये असलेल्या काँग्रेस पक्षाची अडचण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे टीव्हीकेच्या सरकारला घाईगर्दीत पाठिंबा देत आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्याचा अनुभव काँग्रेसला आल्याशिवाय राहणार नाही. पाच राज्यातील विधानसभा निवडणूक निकालाचा आणखी एक अन्वयार्थ म्हणजे या निकालाने देशातील राष्ट्रीय पातळीवरील दोन प्रमुख राजकीय पक्ष म्हणजे भाजपा आणि काँग्रेस हे मजबूत झाले आहेत. मात्र भाजपाची मजबुती आणि या निकालाने काँग्रेसला मिळालेली थोडीबहुत ताकद यांची बरोबरी होऊ शकत नाही. या निवडणूक निकालाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे देशातील प्रादेशिक पक्षांची घसरण सुरू झाली आहे. बिहारमध्ये राजदचा पराभव झाला. ओडिशात प्रदीर्घ काळ सत्तेत असलेल्या बिजू जनता दलालाही पराभवाचे तोंड पाहावे लागले. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला राज्यातील मतदारांनी यावेळी चांगलाच धडा शिकवला. तामिळनाडूत स्टॅलिन यांच्या नेतृत्वातील द्रमुकला सत्ताच्युत व्हावे लागले. बिहारमध्ये आतापर्यंत जदयु या प्रादेशिक पक्षाचाचा मुख्यमंत्री होता; आता भाजपाचा झाला आहे. आप हा प्रादेशिक पक्ष नाही तर राष्ट्रीय पक्ष आहे, पण त्या पक्षाचाही दिल्ली विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला. पंजाबमधील त्या पक्षाचे सरकार शेवटच्या घटका मोजत आहे. पुढील वर्षी म्हणजे २०२७ मध्ये उत्तरप्रदेशात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षालाही आपले चंबुगबाळे गुंडाळावे लागेल, यात शंका नाही.

आपल्या देशातील राजकारण आतापर्यंत बहुतांशपणे प्रादेशिक पक्षांवर अवलंबून होते. अनेक वेळा प्रादेशिक पक्ष प्रादेशिक अस्मितांना हवा देत राष्ट्रीय पातळीवरील पक्षांना पण आपल्या तालावर नाचवण्याचा प्रयत्न करीत होते. आता मात्र ते प्रादेशिक पक्षाच्या कचाट्यातून मुक्त होत असल्याचे आणि ते राष्ट्रीय पक्षांकडे जात असल्याचे या निकालांवरून दिसून आले आहे. मतदारांनी देशातील राजकारण प्रादेशिक पक्षांच्या तावडीतून सोडवत राष्ट्रीय पक्षांकडे सोपुवण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो एक चांगला संकेत म्हटला पाहिजे. हा संकेत देशाच्या राजकारणावर दीर्घकालीन आणि दूरगामी परिणाम करणारा म्हणावा लागेल.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### होर्मुझ संकटामुळे महागाई वाढण्याची शक्यता

अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरू केल्यामुळे इराणने होर्मुझची सामुद्रधुनी जवळजवळ पूर्णपणे बंद केली आहे व यामुळे जागतिक पुरवठा साखळीवर गंभीर परिणाम झाला असल्याचे दिसून येते. या परिस्थितीतही इराणने स्पष्ट केले आहे की, अमेरिका आणि इस्रायल संबंधित जहाजे वगळता इतर जहाजांसाठी हा मार्ग खुला ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहेत, परंतु अतिशय तणावपूर्ण वातावरणामुळे सध्या वाहतूक ठप्प आहे, म्हणजेच जागतिक ऊर्जा व्यापार ठप्प झाला आहे. जगातील सुमारे २० ते २५ टक्के तेलाचा पुरवठा (आयात-निर्यात) याच मार्गातून होतो; सध्याच्या या संघर्षमय परिस्थितीत हा मार्ग बंद झाल्याने तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची संभावना नाकारणे योग्य होणार नाही. युद्ध संपविण्याच्या दृष्टीने आणि होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याबाबतच्या चर्चा दोन्हीही देशांमध्ये होत असल्या, तरी यांत अद्याप तरी काही ठोस निर्णय समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत आखाती देशांमध्ये अडकलेले तेल बाहेर काढण्यासाठी युएईने त्याची यंत्रणा कामाला लावून तेलवाहू जहाजांच्या निर्यातीसाठी गनिमी काव्याचा अवलंब केला होता. इराणने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे इराक, कुवेत आणि कतारसारख्या उत्पादकांनाही त्यांची तेल विक्री थांबवली आहे. सौदी अरेबिया सध्या केवळ लाल समुद्राच्या मार्गाने तेल निर्यात करत आहे. या मुळे जागतिक इंधन बाजारात बरीच उलथापालथ होत असून जागतिक अर्थव्यवस्थेलाही धोका निर्माण झाला आहे.

**संजय श्रौती** /९८६०४५१८४०

### निसर्गाचा समतोल राखा

विकास प्रकल्पासंदर्भात आपले भविष्य घडवणे म्हणजे काय? (तरुण भारत, १३ मे) अभ्यासपूर्ण, चिंतनशील अग्रलेख वाचला. मनापासून आवडला. अग्रलेखातून निसर्गाबद्दल व्यक्त केलेले विचार काळजाला भिडले. खरोखरंच, पुढचे संभाव्य अनर्थ न ओळखल्यास किंवा जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याची किंमत आपणा सर्वांना मोजावी लागेल. त्याकरिता विकासाच्या नावाखाली जंगल-दऱ्या-डोंगर फोडून किंवा मोठमोठ्या झाडांची कत्तल करून काही साध्य होणार नाही. ज्ञान-विज्ञान, पर्यावरणपूरक गोष्टींचा सातत्यपूर्ण अभ्यास करून हवा, पाणी, झाडे, वृक्ष, नदी-नाले यांचं संवर्धन योग्यरीत्या करून निसर्गाचा समतोल राखला पाहिजे तरच अग्रलेखात म्हटल्याप्रमाणे निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते सहजीवनाचे असायला हवे, सार्थक झाल्यासारखे होईल.

**डॉ. राहुल भोसले**/पुणे

••••

### चला, सेंद्रिय शेतीकडे वळूया

पंतप्रधानांनी देशाला परकीय चलन वापराबाबत काटकसरीचे आवाहन केले आहे. ‘जगाचा पोशिंदा’ म्हणून ओळखला जाणारा शेतकरी नकळतपणे रासायनिक शेतीमुळे अन्नसाखळीत निर्माण होणाऱ्या विषाचा भागीदार बनत आहे. या पृष्ठभूमीवर पुन्हा सेंद्रिय शेतीकडे वळण्याची मोठी संधी आपल्या समोर आहे. विषमुक्त शेतीचा स्वीकार केल्यास अन्नसाखळी अधिक निरोगी होईल, पर्यावरणाचे रक्षण होईल आणि पुढील पिढ्यांचे आरोग्यही सुरक्षित राहील. सरकारनेही सेंद्रिय शेतीसाठी येणाऱ्या व्यावहारिक अडचणींवर मात करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे.

**अनिकेत शेटे**/पुणे

••••

### पर्यायी साधनांचा वापर

देशाच्या आर्थिक स्थितीवर नियंत्रण आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल, डिझेल, गॅस व इतर इंधनांचा वापर मर्यादित ठेवण्याचे तसेच काटकसरीचे आवाहन केले आहे. त्याच पृष्ठभूमीवर ठाणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नगरसेवकांसमवेत घोड्यावर स्वार होत तसेच बैलगाड्यांसह ठाणे महापालिकेत अनोख्या आंदोलनाद्वारे प्रवेश केल्याची घटना वाचनात आली. हे आंदोलन अत्यंत वेगळे, विनोदी आणि विचार करायला लावणारे वाटले. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज व्यापारासाठी आले आणि पुढे राज्यकर्ते बनले. त्या काळात रस्ते, वाहतूक आणि इंधनाच्या मर्यादित सुविधा असल्याने घोडे, बैलगाड्या यांसारख्या पारंपरिक साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता.

त्या परिस्थितीतही त्यांनी प्रशासन चालवत अनेक सुविधा आणि योजना निर्माण केल्या. आजच्या या आंदोलनामुळे जणू इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र समोर आले आहे. जर देशाच्या आर्थिक बचतीसाठी इंधन वापरावर नियंत्रण आवश्यक असेल, तर केवळ सामान्य जनतेनेच नव्हे तर केंद्र व राज्य सरकारमधील मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे. आवश्यकतेनुसार पर्यायी साधनांचा वापर करण्यात काहीच गैर नाही.

**सुनील झळके**/भिवंडी, जि. ठाणे

••••

### पर्यावरण रक्षक विकास हाच भविष्य घडविणारा मैलाचा दगड

१३ मे च्या अंकातील अग्रलेख भविष्य घडवणे म्हणजे काय? वाचण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या दृष्टिकोनानुसार विकास प्रकल्पांना समाजातून विरोध करणे जितके अयोग्य तितकेच विकास प्रकल्पाच्या योजना राबविण्यासाठी निरंतर होत असलेला मोठ्या प्रमाणावर काँक्रिटीकरण, गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी होणारी अतोनात वृक्षतोड, कारखान्यांकडून नद्यांना दूषित करण्याचे वाढते प्रमाण, सात-आठ पदरी रस्ते व औद्योगिक वसाहती यामुळे शेत जमिनीचा निरंतर होत असलेला संकोच इत्यादी चालू असलेला पर्यावरणाचा ऱ्हास विकासाच्या योजना राबविणाऱ्या केंद्र व राज्य सरकारांनी व समस्त मानव समाजाने अग्रलेखात सांगितलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून आपला मंगलमय भविष्यकाळ सुनिश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा भावी पिढ्यांना नैसर्गिक स्रोतांचा उपयुक्त असा साठा; पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हस्तांतरित करण्यासाठी आपण निश्चितच असमर्थ ठरू.

**ॲड. प्रकाश देशपांडे** /७०५८९७५३७६

### मोदींच्या कार्यक्षमतेबद्दल शंका का?

वर्षपूर्तीच्या आवाहनाला निर्णय म्हणून समजणारे महाभाग किती कार्यक्षम आहेत, हेच आता मोदींनी इंधन व सोन्याच्या बाबतीत केलेल्या विधानावरून समजून गेले. ज्या जनतेने सातत्याने मोदींना पाठिंबा दिला आहे तो अकार्यक्षम म्हणून दिला का? याचा विचार राहुल गांधी, शरद पवार, रोहित पवार, राज ठाकरे आणि त्यांच्या सवंगड्यांनी करणे अगत्याचे ठरेल. इराण-इस्रायल युद्धाच्या दरम्यान इंधनाचे दर पेट्रोल ५ ते ६० टक्के आणि डिझेलचे दर ८ ते ६५ टक्के वेगवेगळ्या देशांमध्ये वाढले गेले; पण भारतात किती वाढले? याचा अभ्यास का केला जात नाही? भूतान ते म्यानमार अशा जवळजवळ १३ राष्ट्रांमध्ये हे दर वाढले आहेत. मधु दंडवतेंनी अर्थमंत्री असताना इंधनाच्या बाबतीत काही बंधने पाळण्याचे आवाहन केलेच होते. जून १९६७ च्या काळात इंदिरा गांधी यांनीही सोने न खरेदी करण्याबाबत आवाहन केले होते. या सर्वांना देशहितच सांभाळायचे होते; किंबहुना आहे. म्हणूनच आवाहन केले जाते, निर्णय लादले जात नाहीत. मोदीजी देशहितासाठी आवाहन करीत आहेत; परंतु सत्तेसाठी हपापलेल्यांना केवळ मोदींना पाण्यातच पाहायचे आहे. परंतु विरोधकांनी लक्षात असू द्यावे, ‘मोदी है तो मुमकिन है.’ २०२९ पूर्वीच लोकसभेत मोदी बहुमत स्पष्ट करतील, यात शंका नाही. मोदीच भारताला महासत्ता बनविण्यासाठी कार्यक्षम आहेत.

**अमोल करकरे**/खेड-रत्नागिरी, ९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट न ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

### आ.बबनराव लोणीकर यांच्या पाठपुराव्याला यश; भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदे भरल्याने स्वामित्व योजनेला वेग

# परतूर-मंठा मतदार संघातील ५९ गावांतील ११ हजार ८०१ लाभार्थ्यांना लवकरच पीआर कार्ड व मालमत्ता सनद वितरण -आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचा कायदेशीर हक्क मिळवून देणारी केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी स्वामित्व योजना आता जालना जिल्ह्यात प्रभावीपणे आकार घेत असून परतूर आणि मंठा तालुक्यातील एकूण ५९ गावांमध्ये या योजनेचे काम यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. या योजनेअंतर्गत एकूण ११ हजार ८०१ नागरिकांचे पीआर कार्ड तयार झाले असून लवकरच संबंधित लाभार्थ्यांना मालमत्तेची सनद आणि पीआर कार्डचे वितरण करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील मालमत्ता व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि कायदेशीर बनविण्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या मोठ्या कामामागे आमदार बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. भूमी अभिलेख विभागामध्ये दीर्घकाळापासून मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याने मोजणी, सर्वेक्षण, नकाशे तयार करणे, फेरतपासणी आणि नोंदणीची कामे मंदावली होती. हा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन आमदार लोणीकर यांनी महाराष्ट्र विधानसभेमध्ये हा मुद्दा प्रभावीपणे उपस्थित करत भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले आणि संपूर्ण मराठवाड्यात भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदे भरण्यात आली. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यामुळे स्वामित्व योजनेच्या सर्व कामांना अभूतपूर्व गती मिळाली आणि अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण व पीआर कार्ड निर्मितीचे काम पूर्ण होऊ शकले. अधिकृत माहितीनुसार परतूर तालुक्यातील ४३ गावांमध्ये स्वामित्व योजनेचे काम पूर्ण झाले असून येथील ९ हजार ५८९ नागरिकांना त्यांच्या मिळकतीचे पत्र अर्थात पीआर कार्ड मिळणार आहे. तसेच मंठा तालुक्यातील १६ गावांमध्ये योजनेचे काम पूर्ण झाले असून २ हजार २१२ नागरिकांचे पीआर कार्ड तयार झाले आहे. अशाप्रकारे दोन्ही तालुक्यांतील एकूण ५९ गावांमधील ११ हजार ८०१ लाभार्थी आता या ऐतिहासिक योजनेचा लाभ घेणार



आहेत. स्वामित्व योजना ही ग्रामीण भागातील मालमत्तेचे ड्रोनच्या सहाय्याने अचूक सर्वेक्षण करून नागरिकांना त्यांच्या मिळकतीचा कायदेशीर पुरावा उपलब्ध करून देणारी योजना आहे. सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे भौगोलिक माहिती प्रणालीच्या मदतीने डिजिटल नकाशे तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्येक घर, जागा, सीमा, रस्ते आणि मालमत्तेची अचूक नोंद तयार झाली असून भविष्यातील वाद टाळण्यासाठी ही व्यवस्था अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

पीआर कार्ड म्हणजे मालमत्तेच्या मालकी हक्काचा अधिकृत पुरावा असून ग्रामीण नागरिकांसाठी हा दस्तऐवज अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या दस्तऐवजामुळे मालमत्तेचा कायदेशीर पुरावा उपलब्ध होणार असून बँक कर्ज, आर्थिक व्यवहार, वारसाहक्क, खरेदी-विक्री तसेच मालमत्तेसंदर्भातील वाद सोडविण्यास मोठी मदत होणार आहे. यामुळे ग्रामीण नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही नवी दिशा मिळणार आहे, गावठाण किंवा गायरान जमिनीवरील घरे ग्रामपंचायत मार्फत तात्काळ नमुना नंबर ८ ला घेतले जाणार असून स्वतंत्र कार्यक्रमाच्या माध्यमातून पुढील आठवड्यात पी.आर. कार्ड व मिळकत प्रमाणपत्राचे केले जाणार वाटप केले जाणार आहे असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### १८ मे महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यासाठी दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनांत अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जालना जिल्ह्यात डिजिटल स्व-गणना मोहिमेला वेग

#### ५ गावांत १०० टक्के नोंदणी पूर्ण; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या जनगणना २०२७ अंतर्गत डिजिटल स्व-गणना (ड्शश्रष एर्पीशीरींळेप) मोहिमेला जालना जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक गावांनी शंभर टक्के स्व-गणना पूर्ण करण्याचा मान मिळवला आहे. केंद्र सरकारच्या जनगणना विभागाने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांना घरबसल्या स्व-गणना करण्याची सुविधा मिळाली असून जिल्हा प्रशासन, तहसील कार्यालये आणि ग्रामपंचायत यंत्रणा यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर जनजागृती मोहिमा, विशेष शिबिरे आणि ऑनलाइन सहाय्य केंद्रांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अनेक गावांनी अल्पावधीत शंभर टक्के स्व-गणना पूर्ण करत आदर्श निर्माण केला आहे. भोकरदन तालुक्यातील मोहदरी या गावाने विशेष कामगिरी करत गावातील सर्व कुटुंबांची स्व-गणना पूर्ण केली आहे. गावातील एकूण ८० कुटुंबांपैकी सर्वांनी ऑनलाइन नोंदणी केली असून प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसेच हातडी या गावातील ६२ कुटुंबांनीही स्व-गणना पूर्ण केली आहे. या दोन्ही गावांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करून नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षक, तलाठी आणि महसूल कर्मचाऱ्यांनी घरभेटी देत नागरिकांना ऑनलाइन प्रक्रियेबाबत माहिती दिली. याशिवाय जाफ्राबाद तालुक्यातील डोंगरगाव येथेही स्व-गणना मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. गावातील सर्व कुटुंबांनी ऑनलाइन माध्यमातून माहिती नोंदवून मोहिम यशस्वी केली आहे. बदनापूर तालुक्यातील मंठा येथील १६८ घरांपैकी १०० घरांनी स्व-गणना पूर्ण केल्याची माहिती प्रशासनाने दिली. या भागात तहसील कार्यालय, महसूल विभाग आणि जनगणना कर्मचारी यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत मोहिमेबाबत जिल्हा प्रशासनाकडून गावोगावी प्रचार आणि प्रबोधन मोहीम राबवली जात असून नागरिकांना डिजिटल स्व-गणनेचे महत्त्व पटवून दिले जात आहे. जनगणना प्रक्रियेमध्ये नागरिकांचा थेट सहभाग वाढविणे, माहिती संकलन अधिक अचूक करणे आणि वेळेची बचत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## १० अल्पवयीन मुलांसह विना परवाना चालकांवर परतूर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**



शहरात सुसाट वेगाने वाहने चालवणाऱ्या आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध परतूर पोलिसांनी मंगळवारी (१२ मे २०२६) धडक मोहीम राबवली. या मोहिमेत १० अल्पवयीन मुलांसह ट्रिपल सीट आणि विना परवाना वाहन चालवणाऱ्या एकूण २३ वाहनांवर ५८,५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. परतूर शहरात काही अल्पवयीन मुले अत्यंत वेगाने मोटारसायकल चालवत असून, त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत पोलीस प्रशासनाने मंगळवारी विशेष तपासणी मोहीम हाती घेतली. या मोहिमेदरम्यान १० अल्पवयीन मुलांची धरपकड करण्यात आली. ही मुले आपल्या पालकांच्या नावावर असलेली वाहने चालवत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संबंधित पालकांना पोलीस ठाण्यात पाचारण करून, अल्पवयीन मुलांना वाहने चालवण्यास देऊ नका, अशा कडक सूचना देत समज दिली. तसेच, मुलांच्या पालकांच्या नावे असलेल्या वाहनांवर नियम ानुसार दंड आकारण्यात आला. अल्पवयीन चालकांव्यतिरिक्त ट्रिपल सीट प्रवास करणे, वाहन चालवण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) नसणे आणि इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाई केली. एकूण कारवाई केलेली वाहने: २३,अल्पवयीन चालक:१०एकूण वसूल केलेला दंड: ५८,५०० रुपये अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देणे हा त्यांच्या आणि इतरांच्या जिवाशी खेळ आहे. पालकांनी याबाबत सतर्क राहणे आवश्यक आहे. पोलीस प्रशासन,परतूर सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आर. टी. रेंगे यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुदाम भागवत, बालाजी पितळे, गजानन पवार, ज्ञानेश्वर वाघ, अमोल गायकवाड आणि अतुल खंदारे यांच्या पथकाने पूर्ण केली आहे. पोलिसांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे शहरातील टवाळखोर आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## ढगेंच्या कार्यकाळात समाजिक वनीकरण विभागाला आली 'अवकळा'

**तभा वृत्तसेवा**
**परतुर । सुरेश कवडे पाटील**



परतुर तालुक्यातील सामाजिक वनीकरण लागवड कार्यालय अंतर्गत राबविण्यात आलेल्या घनवन प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला असून याप्रकरणी मा. जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे सविस्तर निवेदन देऊन उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली आहे. २०२५-२०२६ या कालावधीत सामाजिक वनीकरण लागवड तालुका कार्यालयामार्फत अकोली, कराळा, सुरूमगाव, पांडेपोखरी, श्रिष्टी, नागापूर व कोरेगाव या गावांमध्ये राबविण्यात आलेल्या घनवन प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा संशय निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.

झाडे जोपासण्यासाठी पाण्याच्या टँकरच्या नावाखाली लाखो रुपयांचा खर्च दाखविण्यात आला असून प्रत्यक्ष कामाच्या तुलनेत हा खर्च अत्यंत संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पाणी खरेदी, देयके व संबंधित व्यवहारांमध्ये पारदर्शकता नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. तसेच मजुरांच्या नावावर मोठ्या प्रमाणात खर्च दाखविण्यात आला असला तरी प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांची खात्रीशीर नोंद उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. मस्टर रोलमध्ये बनावट नावे, फुगवलेले खर्च आणि बोगस मजूर दाखवून शासन निधीचा अपहार करण्यात आल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सामाजिक वनीकरण लागवड अधिकारी श्री. ढगे हे कार्यालयात अत्यंत कमी वेळा उपस्थित राहत असल्याने कार्यालयीन कामकाज विस्कळीत झाले असून कार्यालयात नियमितपणे अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही अनधिकृत व्यक्तींकडून कार्यालयीन कामकाज चालविले जात असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. याशिवाय कोणत्याही मूलभूत सुविधा नसतानाही प्रचंड खर्च दाखविण्यात आला असून हा खर्च बोगस असल्याचा ठाम संशय व्यक्त करण्यात आला आहे. मजुरांच्या देयकांसाठी वापरण्यात आलेली काही बँक खाती संशयास्पद असून प्रत्यक्ष पडताळणीत बनावट अथवा नावधारी खाती असल्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित अधिकारी व काही स्थानिक व्यक्तींनी संगनमताने शासकीय निधीचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र समितीमार्फत सखोल चौकशी करून पाण्याच्या टँकर खर्च, पाणी खरेदी व्यवहार, मजुरी खर्च तसेच बँक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, संबंधित कागदपत्रांची तपासणी करून दोषींवर योग्य कारवाई करण्यात यावी आणि शासनाच्या निधीचा अपहार झाल्यास तो तात्काळ वसूल करण्यात यावा, अशी मागणी मनसेने केली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## पळवलेल्या अल्पवयीन मुलीचा अखेर शोध

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

तिर्थपुरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित अपहरण प्रकरणातील अल्पवयीन पीडित मुलीचा शोध घेण्यात अ.मा.वा. प्र. कक्ष जालना यांना यश आले आहे. तसेच या प्रकरणातील आरोपीसही ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी तिर्थपुरी पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, तिर्थपुरी पोलीस ठाणे येथे गुरनं ६४/२०२४ भादंवि कलम ३६३ अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली होती. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस दि. १८ मार्च २०२४ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास तिर्थपुरी ता. घनसावंगी येथील गजानन रावसाहेब वानखेडे (वय २५) याने लग्नाचे आमिष दाखवून फूस लावून पळवून नेले होते. या प्रकरणात गुन्हा दाखल



झाल्यानंतरही तब्बल दोन वर्षे आरोपी व पीडित मुलगी यांचा शोध लागला नव्हता. त्यामुळे मा. पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये दि. ०८ जानेवारी २०२५ रोजी सदर गुन्ह्याचा पुढील तपास अ.मा.वा. प्र. कक्ष जालना यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता.

त्यानंतर अ.मा.वा. प्र. कक्षातील अधिकारी व अंमलदारांनी आरोपीबाबत गोपनीय माहिती संकलित करून तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी हा शिरोली ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने संबंधित ठिकाणी जाऊन आरोपी व पीडित मुलीस ताब्यात घेतले आणि पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी तिर्थपुरी पोलीस ठाण्यात हजर केले. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक तेघवीर सिंह संधू (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी तसेच पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत अ.मा.वा. प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, पोहेकॉ सागर बावीस्कर (स्थागुशा), महिला अंमलदार पुष्पा खरटमल, संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड तसेच चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी सहभाग घेतला.

## भास्करराव अंबेकर यांनी घेतली तेगबीर सिंग संधू यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना जालना जिल्हा संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांनी पोलिस अधीक्षक तेघबीर सिंग संधू यांची सदिच्छा भेट घेऊन स्वागत केले. यावेळी शहरामधील कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. जालना जिल्ह्यात आपण पोलिस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यापासून काही सकारात्मक बदल शहरात दिसत आहेत. त्याबद्दल समाधान व्यक्त केले, तर शहरातील वाढती गुन्हेगारी, बेशिस्त वाहतूक, अवैध धंदे, भाईगिरी, शाळा महाविद्यालये व शिक्षण संस्थांसमोर उभे राहून तरुण मुली व विद्यार्थिनींना त्रास देणारे रोडरोमिओ यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली.

# हातवण बृहत लघु प्रकल्प व दुधना नदीवरील को.प.बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतराला गती

### आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश; दोन्ही प्रकल्पांना हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासाठी महत्त्वाचे ठरणारे हातवण बृहत लघु प्रकल्प तसेच दुधना नदीवरील को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर या दोन महत्त्वपूर्ण प्रकल्पांसंदर्भात आज मंत्रालयात जलसंपदा मंत्री मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. ही बैठक आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष आग्रहास्तव आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत हातवण बृहत लघु प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत तसेच दुधना नदीवरील को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. दोन्ही प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आल्याची माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी दिली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी हातवण बृहत लघु प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया तातडीने राबविण्यासाठी सुमार १५० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे मंत्री



महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर येणाऱ्या अधिवेशन काळात पुरवणी मागण्यांमधून १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येईल तसेच पुढील तीन महिन्यांत भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. तसेच संबंधित विभागांनी या दोन्ही कामाच आजपासूनच प्रस्ताव तयार करण्याच्या कामाला लागावे, अशा सूचनाही मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना लवकरच भूसंपादनाची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. बैठकीला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अर्जुनराव खोतकर (ऑनलाईन), व्यवस्थापकीय संचालक गोदावरी पाटबंधारे मंडळ, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता भारत शेंडगे, कार्यकारी अभियंता वानखेडे, कृषी अधिकारी, भूसंपादन विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दीर्घकाळापासून या दोन्ही प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगताना आमदार अर्जुन खोतकर म्हणाले की, या बैठकीमुळे दोन्ही प्रकल्पांना हिरवा कंदील मिळाला असून लवकरच हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे.

» हातवण बृहत लघु प्रकल्प व दुधना नदीवरील बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर हे जालना जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे प्रकल्प आहेत. अनेक दिवसांपासून मी सातत्याने या संदर्भात पाठपुरावा करत होतो. आजच्या बैठकीत सकारात्मक निर्णय झाल्याने हे दोन्ही प्रकल्प निश्चितच लवकर मार्गी लागतील. या मध्ये ७१४.१५ हेक्टर जमीन संपादित होणार असून जवळपास ५००० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे व गोलापांगरी, बठाण ,गाडे सावरगाव, माली पिंपळगाव, कारला ,करडगाव,चितळी पुतळी आदी को.प. बंधाऱ्याचे बॅरिजेस मध्ये रूपांतर होऊन यामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर शेती सिंचनाखाली येणार आहे .शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटून परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळेल.

# लिगो इंडिया प्रकल्पाच्या पायाभूत विकास कामांवर भर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

मौजे दुधाळा येथे प्रस्तावित असलेल्या महत्त्वाकांक्षी 'लिगो इंडिया' प्रकल्पाच्या अनुषंगाने विविध विकासकामांबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीमध्ये विविध पायाभूत विकासकामांवर भर देण्यात आला असून, प्रकल्प पूर्ण करताना जिल्ह्याच्या विकासासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याचे या उच्चस्तरीय बैठकीत सांगण्यात आले.

या बैठकीला अणुऊर्जा संशोधन आणि विकास विभागाचे संचालक नितीन जावळे, अणुऊर्जा वित्त विभागाचे सहसचिव मुथु कृष्णन शंकर नारायणन, लिगो इंडिया प्रकल्प प्रमुख सेंधील राजा एस तसेच लिगो इंडिया प्रकल्प समन्वयक समीर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा खनिकर्म अधिकारी अश्विन माने, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी, सहाय्यक संचालक नगर रचना विभाग, पूर्णा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता, सहाय्यक आयुक्त नगरपालिका प्रशासन तसेच जिल्हा कृषी अधीक्षक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी बैठकीत सहभागी झाले होते. जिल्हा प्रशासनाकडून या प्रकल्पपूर्तीसाठी आवश्यक बाबी वेळेत पूर्ण करण्यात येतील. तसेच येथील प्रकल्पासाठी आवश्यक असण-ारे भूसंपादनही पूर्ण झाले असून, भविष्यात प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सेवा-सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात येतील, असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता हे स्वत: प्रकल्पाला भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीदरम्यान लिगो इंडिया प्रकल्पाच्या सीमारेषेपासून ५ किलोमीटर, १५ किलोमीटर, ३० किलोमीटर आणि ६० किलोमीटर अंतराच्या परिघात लागू करण्यात आलेल्या विविध निर्बंधांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये स्टोन क्रेशर उद्योग, खाणकाम व ब्लास्टिंग आधारित उद्योग, २० अश्वशक्तीपेक्षा अधिक ऊर्जा लागणारे रेसिप्रोकेटिंग उद्य-ोग, नवीन वीज प्रकल्प, पवनचक्की उभारणीवरील निर्बंध लादण्याबाबत चर्चा करण्यात आली.

हिंगोली जिल्ह्याच्या औद्योगिक आणि पायाभूत विकासाच्या दृष्टीने हे निर्बंध लिगो प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित होईपर्यंत शिथिल करण्यात यावेत, तसेच काही निर्बंधांमध्ये अंशतः सूट देण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बैठकीत केली. जिल्ह्यातील विकासकामांवर होण-ारा परिणाम लक्षात घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये अणुऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी लिगो इंडिया एम्पावर्ड बोर्डाम ध्ये या सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात येईल आणि सकारात्मक निर्णयासह आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन जिल्हा प्रशासनाला बैठकीत दिले. या बैठकीमुळे हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी तसेच लिगो इंडिया प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुढील काळात महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आ. डॉ. प्रज्ञा सातव यांनी घेतली विधान परिषद सदस्यत्वाची शपथ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये बिनविरोध विजयी झाल्यानंतर आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव यांनी गुरुवारी विधान भवन,येथील विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात विधान परिषद सदस्यत्वाची शपथ घेतली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर,विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनस-ोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते. शपथविधी दरम्यान आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव यांनी राष्ट्रमाता माँ जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,माता रमाई आणि दिवंगत खासदार राजीव सातव यांना विनम्र अभिवादन केले. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या टीमचे आभार मानले. यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव म्हणाल्या, येणाऱ्या काळात राज्यातील शेतकरी, युवक आणि महिलांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याला माझे प्राधान्य असेल. तसेच हिंगोली जिल्ह्यातील सिंचनाचे विषय, शिक्षण विभागाच्या समस्या आणि शासकीय कार्यालयांमधील अपुऱ्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न सभागृहात मांडून तो मार्गी लावण्यासाठी सरकारचे लक्ष वेधून हे प्रश्न पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# हिंगोलीत मे-जून महिन्याचे धान्य वाटप एकाचवेळी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

येथील म्हसोबा गल्ली भागातील रास्त भाव धान्य दुकानदार नवनाथ कानबाळे यांच्या दुकानात शासनाच्या आदेशानुसार मे आणि जून २०२६ या दोन्ही महिन्यांचे अन्नधान्य वाटप एकत्रितपणे सुरू करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ऐन उन्हाळ्यात कार्डधारकांना मोठा दिलासा मिळाला असून, धान्य घेण्यासाठी लाभार्थ्यांनी म ोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे.

शासनाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर किंवा नियोजनाचा भाग म्हणून दोन म हिन्यांचे धान्य एकत्र देण्याचे निर्देश दिले होते. यानुसार म्हसोबा गल्लीतील केंद्रावर शिस्तबद्ध पद्धतीने वाटप केले जात आहे. लाभार्थ्यांना त्यांचे हक्काचे गहू, तांदूळ आणि इतर शिधा वस्तू ई-पॉस मशीनवर अंगठा घेऊन पारदर्शकपणे दिल्या जात आहेत. दोन महिन्यांचा कोटा एकदाच मिळत असल्याने आम्हाला वारंवार दुकानात येण्याची गरज उरणार नाही. धान्य वेळेवर आणि योग्य प्रमाणात मिळत आहे, असे एका म हिला लाभार्थ्याने सांगितले.

या वाटप प्रक्रियेदरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी दुकानदार नवनाथ कानबाळे यांनी विशेष नियोजन केले आहे. रांगेत उभ्या असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सावलीची व्यवस्था करण्यात आली असून, नियमानुसार धान्य मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

# राज्यसभा खासदार रामराव वडकुते ई-बाईकवरून जिल्हा कचेरीत पोहोचले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

देशात पेट्रोल-डिझेल टंचाईची परिस्थिती निम र्ण होत असताना पर्यावरणपूरक आणि पर्यायी वाहतुकीचा संदेश देण्यासाठी राज्यसभा खासद-ार ठराॲ थरवर्झीश यांनी हिंगोली शहरात ई-बाईकवरून प्रवास करत जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या पर्यावरणपूरक वाहतुकीच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून त्यांनी हा उपक्रम राबविला.

यावेळी बोलताना खासदार वडकुते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी दिलेल्या सूचनांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. इंधन बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी ई-वाहनांचा वापर वाढणे काळाची गरज आहे. मी स्वतः ई-बाईकवर विविध शहरांमध्ये फिरणार असून, उन्हाळा असला तरी ई-मोटरसायकलचाच वापर करणार आहे. तसेच लवकरच ई-कारही घेणार आहे. ते पुढे म्हणाले, देशाच्या भविष्यासाठी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे. आपण लोकांना जे सांगतो, ते स्वतःही आचरणात आणले पाहिजे. संत एकनाथ महाराजांनी कृतीतून समाजाला संदेश दिला, त्याच पद्धतीने आपणही वागले पाहिजे. हिंगोली शहरात खासदार वडकुते यांनी ई-बाईकवरून जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या या उपक्रमाची शहरात चर्चा रंगली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### महिला लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

हिंगोली- माहे मे, २०२६ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. १८ मे) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### भाजपची १६ व १७ मे रोजी कार्यशाळा

हिंगोली- भारतीय जनता पक्षाच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत हिंगोली जिल्हास्तरीय दोन दिवसीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. १६ व १७ मे रोजी शहरातील हॉटेल शांती येथे ही कार्यशाळा पार पडणार आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचा प्रारंभ होणार आहे. समर्थ कार्यकर्ता सशक्त संघटना संकल्पनाया निवासी कार्यशाळेचा मुख्य उद्देश पक्षाची विचारधारा, संघटनात्मक बांधणी आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा तळागाळा-तील लोकांपर्यंत प्रभावी प्रसार करणे हा आहे. समर्थ कार्यकर्ता सशक्त संघटना या संकल्पनेवर ही कार्यशाळा आधारित आहे. वरिष्ठ नेत्यांचे लाभणार मार्गदर्शनदोन दिवसीय प्रशिक्षणात विविध सत्रांमध्ये कार्यकर्त्यांना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यामध्ये माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, विधान परिषद सदस्य प्रा. संजय भेंडे, मराठवाडा संयोजक मनोज पांगरकर, प्रदेश सचिव प्रविण घुगे, माजी जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा, प्रदेश प्रवक्ता लक्ष्मणराव सावजी, प्रदेश प्रवक्ता विन-ोद वाघ, भाजप नेते किरण पातुरकर यांचा समावेश आहे. या कार्यशाळेला खासदार रामराव वडकुते, जिल्हा प्रभारी संजय कौडगे, आमदार तान्हाजीराव मुटकुळे, आमदार डॉ. प्रज्ञ-ाताई सातव,माजी आ.जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा संयोजक फुलाजीराव शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष बाबाराव बांगर, अतिश दांडेगावकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.चित्र व माहिती फलकांचे प्रदर्शन कार्यशाळेच्या निमित्ताने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा जीवनप्रवास, त्यांचा एकात्म मानव-वाद आणि अंत्योदय विचार मांडला जाणार आहे. तसेच भारतीय जनसंघापासून ते आजच्या भाजपपर्यंतचा ऐतिहासिक प्रवास, केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना आणि हिंगोली जिल्ह्यात झालेल्या विकासकामांची माहिती चित्रांच्या व माहिती फलकांच्या प्रदर्शनातून मांडली जाणार असल्याची माहिती जिल्हा संयोजकांनी यांनी दिली.

# पत्रकारांच्या घरांसाठी लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक होणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

पत्रकारांच्या घरकुलाच्या प्रश्नावर लवकरच मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक घेण्यात येणार असून, पत्रकारांना न्याय देण्यासाठी शासन सकारात्मक असल्याची माहिती आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.

पत्रकारांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत आयोजित चर्चेदरम्यान आमदार तान-ाजी मुटकुळे बोलत होते. जिल्ह्यातील पत्रकारांना घरकुल योजना उपलब्ध करून देणे, शासकीय सव-लती आणि पत्रकारांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण धोरण यासंदर्भात मुख्यमंत्री स्तरावर चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार समाज हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यांना सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन मिळावे यासाठी शासनाने ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. पत्रकारांच्या घराच्या प्रश्नावर लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन सकारात्मक मार्ग काढला जाईल, असे आमदार मुटकुळे यांनी स्पष्ट केले.

यावेळी पत्रकार प्रतिनिधींनी घरकुल योजना, भूखंड उपलब्धता, तसेच आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांची मागणी केली. त्यावर शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिले. पत्रकार संघटनांकडून या भूमिकेचे स्वागत करण्यात येत असून, आगामी बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी कल्याण देशमुख, सुनील पाठक, विजय गुंडेकर, संतोष भिसे, सुधाकर वाढवे यांच्यासह पत्रकार संघटनेचे पदाधिकारी व सर्व माध्यमांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती.

# अडीच हजारांची लाच घेतांना ग्रामसेवकास रंगेहाथ पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

घरकुलाच्या चौकशी अहवालावर स्वाक्षरीसाठी अडीच हजाराची लाच स्विकारतांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सवना येथील ग्रामसेवकास दि १३ मे रोजी गोरेगाव येथे मोठ्या शिताफीने सापळा रचून रंगेहाथ पकडले आहे. याप्रकरणी ग्रामसेवकाविरूध्द गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांकडून मिळालेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील सवना येथील एका लाभार्थ्याला घरकुल मंजूर झाले होते. या घरकुलाच्या पाहणीचा अहवाल ग्रामसेवकाच्या स्व-ाक्षरीने पुढे पाठविणे आवश्यक होते. त्यासाठी तक्रारदाराने ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी याच्याकडे प्रस्ताव सादर करून पाठपुरावा सुरू केला होता मात्र रामप्रसाद याने स्वाक्षरी देण्यास टाळाटाळ सुरू केली होती. त्यानंतर त्याने तक्रारदाराकडे तीन हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती अडीच हजार रूपये देण्याचे ठरले होते. या प्रकरणात तक्रारदाराने ला-चलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. सदर रक्कम दि १३ मे रोजी देण्याचे ठरले होते. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत, उपनिरीक्षक विजय शुक्ला, जमादार शेख अकबर, शेख शकील, रविंद्र वरणे, विन-ोद पुंडगे, गोविंद शिंदे, गजानन पवार, वाघ यांच्या पथकाने गोरेगाव चौफुली येथे सापळा रचला होता. दुपारच्या सुमारास ग्रामसेवक रामप्रसाद याने तक्रारदाराकडून अडीच हजार रूपयांची लाच स्विकारताच पथकाने ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी यास रंगेहाथ पकडले. याप्रकरणी गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हिंगोली जिल्हास्तरीय बुध्दीबळ निवड चाचणी स्पर्धा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १४ मे**

हु. बहिर्जी स्मारक विद्यालय, वसमत येथे दि. १२ मे २०२६ रोजी हिंगोली जिल्ह-ास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन म ान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन हु. बहिर्जी स्मारक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण शेळके यांच्या हस्ते झाले. यावेळी खो-खो संघटनेचे हिंगोली जिल्हा सचिव गजमल, विद्यालयाचे शिक्षक नवीन शेळके, हिंगोली जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव एम. ए. बारी, बॉक्सिंग संघटनेचे जिल्हा सचिव फिरोज पठाण तसेच सॉफ्ट टेनिस संघटनेचे प्रशिक्षक प्रकाश अडकिने यांची प्रमुख उपस्थिती होती. खेळाडूंचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध व आनंददायी वातावरणात पार पडली. जिल्ह्यातील विविध भागांतून सहभागी झालेल्या खेळाडूंनी उत्कृष्ट बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि खेळातील कौशल्याचे प्रदर्शन केले. या निवड चाचणीतून १० मुलगे व ४ मुली अशा एकूण १४ खेळाडूंची पुणे येथे दि. १५ ते १७ मे दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी निवड झालेल्या सर्व खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देत जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल करण्याचे आवाहन केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे व उपस्थित पालकांचे कौतुक करण्यात आले.

# औंढा नागनाथ येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ मे**

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती औंढा नागनाथ येथील पंचायत समिती सभागृहात गुरुवारी (ता. १४) साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला राधेश्याम परांडकर व समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रमेशराव सानप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विस्त-ार अधिकारी सय्यद जमीर, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रमेशराव सानप, पत्रकार बाळासाहेब साळवे, राधेश्याम परांडकर, सुनील गुठे, उदय देशपांडे, विशाल इंगोले, शिवाजी टोम्पे, मनोज कांबळे,शिवशंकर गुडमे, अंबादासकुहीरे शिवकुमार गिरबनवाड,अक्षय बगाटे, संजय सावंत, अभिजीत गायकवाड, सीमा थोरात, जयश्री भाकरे, शेख नगमा, मिलिंद कुकरे, रमेश फोपसे, किसन टोम्पे, पिराजी हाके यांच्यासह पंचायत समितीमधील कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती समृद्ध करा :जिल्हाधिकारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मे -**

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक शाश्वत आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व आधुनिक कृषी अवजारांचा वापर करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेती समृद्ध करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आज मौजे लालवंडी (ता.नायगाव) येथे संस्कृती संवर्धन मंडळ, कृषी विज्ञान केंद्र सगरोळी आणि हवामान अनुकूल शाश्वत विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तंत्रज्ञान प्रात्यक्षिक प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, उपविभागीय कृषि अधिकारी वी बी गित्ते, तालुका कृषि अधिकारी नायगाव दिपेश देवरे व कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

**आधुनिक यंत्रांचे सादरीकरण**

यावेळी शेतातील पीक अवशेष व्यवस्थापनासाठी 'ट्रॅक्टरचलित श्रेडर' आणि जमिनीतील कठीण थर फोडून पाणी मुरवण्याची क्षमता वाढवण्यासाठी 'सबसॉइलर' या यंत्रांचे प्रत्यक्ष कार्य करून दाखवण्यात आले. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी तंत्रज्ञानाची पाहणी करून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा वापर करावा, असे आवाहन केले.

**खरीप पूर्व मोहिमेचा आढावा**

प्रात्यक्षिकानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी



विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'खरीप हंगाम पूर्व गाव मोहिमे'ला भेट दिली. यावेळी त्यांनी खालील बाबींवर विशेष भर दिला: बियाणे उगवण क्षमता: पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी घरच्या घरी बियाण्यांची उगवण क्षमता तपासावी. बीजप्रक्रिया: पिकांच्या संरक्षणासाठी बीजप्रक्रिया करूनच पेरणी करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. घरचे सोयाबीन बियाणे: बियाण्यांवरील खर्च कमी करण्यासाठी घरचेच सोयाबीन बियाणे वापरण्याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

**महिला बचत गटांसाठी 'अवजारे बँक'**

या कार्यक्रमात कृषी विभागाच्यावतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत ग्राम स्तरावर महिला बचत गटांसाठी सुरु करण्यात आलेल्या 'कृषी अवजारे बँक' योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. महिलांनी कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून पुढे यावे, यासाठी ही योजना मैलाचा दगड ठरेल, असे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास लालवंडी व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विज्ञान केंद्राचे तज्ज्ञ आणि कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तांत्रिक मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

# भावाने केला भावाचा खून ; जयभीम नगर येथील घटना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मे -**

शहरातील जयभीम नगर परिसरात भावानेच छोट्या भावाचा दगडाने ठेचून खून केल्याची धक्कादायक घटना घडली असून शहरात खळबळ उडाली आहे. या घटनेत प्रकाश उत्तम खाडे (२०) याचा मृत्यू झाला आहे. सदरची घटना काल मध्यरात्री घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ तारखेच्या मध्यरात्रीनंतर साधारणपणे रात्री एकच्या सुमारास हा प्रकार घडला. प्रकाश हा एका दुकानात असताना त्याचा मोठा भाऊ पप्पू उत्तम खाडे याने डोक्यात दगड घालून गंभीर मारहाण केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या हल्ल्यात आकाश गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून दोन्ही भावांमध्ये नेमका कोणत्या कारणावरून वाद झाला होता, याबाबत माहिती मिळालेली नाही. कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनीही आश्चर्य व्यक्त केले आहे. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी संबंधित भावाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# अवैध जुगार व्यवसायाविरोधात ग्रामीण पोलीसांची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मे -**

नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवैध जुगार व्यवसायाविरोधात मोठी कारवाई करत एका दिवसात तीन वेगवेगळ्या जुगार अड्ड्यांवर छापे टाकून १७ आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन आणि चार दुचाकींसह एकूण ६ लाख ४० हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, पोलीस उप निरीक्षक व्यंकट कुसमे, ज्ञानेश्वर मठवाड, बाबुराव चव्हाण, पोलीस अंमलदार वसंत केंद्रे, अर्जुन मुंढे, मारोती पंचलिंग, विनोद पवार, विष्णू कल्याणकर, संतोष पवार, असिफ अली, गवेंद्र सिरमलवार, जमीर अहेमद, हनुवता कदम, हणमंत तेलंग,



शंकर माळगे, समीर अहेमद, सचिन चावरे यांनी केली. गोपनीय माहितीच्या आधारे गोकुळवाडी परिसर, विष्णुपुरी येथील बंद बायपास परिसर आणि मुगट परिसरात छापे टाकण्यात आले. या कारवाईत महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७अंतर्गत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आहेत.

पहिल्या कारवाईत पवन बनकर, साईनाथ वडजे, परशुराम उबाळे, प्रवीण आनलदास, वैभव पुंजरवाड, राजेश सुतार, प्रदीप कानगुर्ले आणि अशोक शिंगणगुटे यांच्यासह अन्य आरोपींना पकडण्यात आले. दुसऱ्या कारवाईत सुरेश उर्फ सानू नामकीर, ओमकार शेख, हरीसिंग जपलसिंग, शेख आसिफ आणि शुभंकर हंबर्डे यांच्यावर कारवाई करण्यात आली. तर तिसऱ्या कारवाईत मोहम्मद निसार मोहम्मद यासीन, मोहम्मद फारुख रफीक, फैसल चाऊस सलाम चाऊस आणि मोहम्मद अकबर शेख बाबू यांना जुगार खेळताना पकडण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, मोबाईल फोन आणि मोटारसायकली जप्त केल्या आहेत. नांदेड ग्रामीण पोलिसांनी १ मेपासून आतापर्यंत अवैध जुगार व्यवसायाविरोधात विशेष मोहीम राबवून १२ गुन्हे दाखल केले असून, एकूण ५० आरोपींवर कारवाई करत १८ लाख ५७ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# भिसी ग्रामपंचायतीत 'रामभरोसे' कारभार

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १४ मे -**

किनवट तालुक्यातील मौजे भिसी येथील ग्रामपंचायतीचा कारभार सध्या पूर्णपणे 'रामभरोसे' सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांमधून केला जात असून, ग्रामपंचायत अधिकारी सतत गैरहजर राहत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीसारख्या महत्त्वाच्या दिवशीही संबंधित अधिकारी कार्यालयात अनुपस्थित असल्याचा आरोप होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मौजे भिसी येथील ग्रामपंचायत सदस्य नंदू दाउजी गायकवाड यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट यांच्याकडे लेखी निवेदन देत ग्रामपंचायत अधिकारी सौ. मोरे मॅडम यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. कार्यालयात अधिकारीच नसतील तर नागरिकांनी कामासाठी कुणाकडे जावे? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

## अधिकारी सतत गैरहजर, कारवाईअभावी उपोषणाचा इशारा

माहितीनुसार, संबंधित अधिकारी वारंवार ग्रामपंचायतीला दांडी मारत असल्याने ग्रामस्थांची विविध कामे रखडली आहेत. जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रमाणपत्रे, शासकीय कागदपत्रे तसेच विकासकामांशी संबंधित फाईली प्रलंबित राहत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील नागरिकांना वारंवार ग्रामपंचायतीचे हेलपाटे मारावे लागत असून, कार्यालय उघडे असते; पण अधिकारी मात्र गायब, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून उमटत आहे.

यापूर्वी दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजीही गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. तक्रारी करूनही कारवाई होत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कुणाचा वरदहस्त आहे का? अशी चर्चा आता गावपातळीवर उघडपणे सुरू झाली आहे.

दरम्यान, ग्रामपंचायत सदस्य नंदू दाउजी गायकवाड यांनी दिनांक १२ मे २०२६ रोजी पुन्हा निवेदन देत प्रशासनाला अंतिम इशारा दिला आहे. पुढील सात दिवसांच्या आत सौ. मोरे मॅडम यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही, तर दिनांक २४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

गावपातळीवरील प्रशासनच जर निष्क्रिय झाले तर सर्वसामान्य नागरिकांनी न्यायासाठी कुणाकडे पाहायचे? असा सवाल आता भिसी परिसरात जोर धरू लागला आहे. त्यामुळे पंचायत समिती प्रशासन या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहणार की पुन्हा नेहमीप्रमाणे दुर्लक्ष करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मुदखेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्यासाठी उपोषण

**नांदेड** -भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मुदखेड शहरात उभारण्यास परवानगी मिळावी, यासाठी अनेक वर्षांपासून पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने सामाजिक कार्यकर्ते मारोती शिवाजी डुबुकवाड यांनी



आक्रमक पवित्रा घेतला आहे. या मागणीसाठी त्यांनी दि.१२ मे २०२६ पासून साखळी उपोषण सुरू करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नगरपालिकेने स्वतःच्या निधीतून दि.१४ मार्च १९८९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा खरेदी केला आहे. मात्र, गेल्या ४० वर्षांपासून हा पुतळा पालिकेच्या बंद खोलीत धूळ खात पडला आहे. पुतळा उभारणीसाठी शासन निर्णयानुसार आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या आणि ठराव प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मुदखेड नगरपालिकेने दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी पुतळा समिती स्थापन करून तसा ठरावही दिला आहे. तसेच मुख्याधिकाऱ्यांच्या पत्रानुसार गट क्रमांक ५६५ मधील रस्त्यापासून ३ मीटर अंतराच्या आत पुतळा बसवण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. मारोती डुबुकवाड यांनी निवेदनात म्हटले आहे की, महापुरुषांचा पुतळा इतकी वर्षे बंद खोलीत ठेवणे हा त्यांचा अपमान आहे. वारंवार अर्ज करूनही मुदखेड नगरपरीषद व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अंतिम परवानगी मिळण्यास विलंब होत आहे. जर प्रशासनाने दि.१ जून २०२६ पर्यंत यावर ठोस कारवाई केली नाही, तर मुदखेडकरांच्या वतीने नाईलाजास्तव त्या जागेवर ३ मीटर जागा सोडून पुतळ्याचे काम सुरू केले जाईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार मुदखेड, पोलीस निरीक्षक मुदखेड आणि मुख्याधिकारी नगरपालिका मुदखेड यांना माहितीसाठी देण्यात आल्या आहेत. आता या संवेदनशील विषयावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# आमदार राजेश पवार यांच्या वाढदिवसानिमित्त फळांचे वाटप

**नरसी** -नायगाव-उमरी-धर्माबाद मतदारसंघाचे आमदार यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत नायगाव येथील ग्रामीण



रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आमदार राजेश पवार यांचे कट्टर समर्थक राजेश पाटील हंबर्डे व बाबासाहेब पाटील हंबर्डे हुसेकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम उत्साहात पार पडला. दि. १४ मे रोजी आयोजित या उपक्रमात ग्रामीण रुग्णालयातील उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करून आमदार राजेश पवार यांचा वाढदिवस सेवाभावी पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. तसेच रुग्णांना लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या. कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा पपुलवाड, यांची प्रमुख उपस्थिती होती.

# धोबी समाज वधू-वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मे -**

नांदेड येथे होणाऱ्या सर्व धोबी समाज वधू-वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली असून रविवार, दि. २४ मे रोजी हॉटेल विसावा शिवाजीनगर नांदेड येथे होणाऱ्या वधू-वर पालक यांच्यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी सर्व बाहेर गावाहून येणाऱ्या धोबी समाजातील मान्यवर, कीर्तनकार व नांदेड येथील सर्व समाजातील पत्रकार यांना नॅशनल धोबी महासंघातर्फे सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. तरी पत्रकार व कीर्तनकार यांनी आयोजकांकडे नावनोंदणी करून घ्यावी, असे आवाहन नॅशनल धोबी महासंघाचे सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष संतोषजी औंढेकर आणि मेळाव्याचे स्वागताध्यक्ष डॉ. पांडुरंग इभुतवार, डॉ. सौ. आशाताई पी. इभुतवार यांनी केले आहे.

सर्व धोबी समाज वधू-वर परिचय मेळाव्यास समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नॅशनल धोबी महासंघाचे राज परदेशी पुणे, हरीश मस्के अकोला, वामनराव पेनूरकर नांदेड, संतोष औंढेकर, कोंडिबा मांजरमकर, मार्तंड भंडारे, प्रमोद भंडारे, बाबुराव कलुरे, पिंटू मारवाडीकर, राजू येवले, करण तेलंग, शिवाजी काकांडीकर, गोविंदराव कुंटूरकर, मुत्तेपवार, मारोतराव सुरूंगवाड, एस.जी. माचनवार, वामन शिंदे नाशिक, प्रवीण धुराटकर अमरावती, सौ. रेखाताई पाटील नागपूर, विपीन रजक पुणे आदींनी केले आहे.

# ग्रामीण गृहनिर्माणात नांदेड जिल्हा परिषदेचा राज्यात डंका

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मे -**

ग्रामीण भागातील बेघर व गरजू नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध स्तरावर प्रभावी प्रयत्न करण्यात येत आहेत. या अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत नांदेड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, तालुका स्तरावर माहूर तालुक्याने राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरीचा मान मिळविला आहे.

महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली. राज्य पुरस्कृत आवास योजनेत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच मोदी आवास योजना या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत नांदेड जिल्ह्याने उत्कृष्ट कार्य करत राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. त्याचबरोबर आदिवासी बहुल माहूर तालुक्यानेही उत्कृष्ट नियोजन व प्रभावी अंमलबजावणीच्या जोरावर राज्यात सर्वोत्कृष्ट तालुक्याचा बहुमान मिळविला आहे.

या यशामागे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्यांनी वेळोवेळी बैठका घेऊन योजनांचा आढावा घेतला. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी सातत्याने पाठपुरावा करून अभियान गतिमान केले. त्यामुळेच नांदेड जिल्ह्याला राज्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला आहे.

माहूर तालुक्यातही योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. लाभार्थ्यांना वेळेत घरे मंजूर करणे, बांधकाम पूर्णत्वास नेणे आणि शासनाच्या उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता करणे यामध्ये माहूर तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली.

**पुरस्कारचे आज वितरण**

या पुरस्कारांचे वितरण आज १५ मे रोजी सैनिक स्कूल, सातारा येथे होणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले तसेच माहूरचे गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात काळ्याफिती आंदोलनास सुरुवात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ मे -**

महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कृती समितीच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या पहिल्या टप्प्याला आजपासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे सुरुवात करण्यात आली. विद्यापीठातील विविध कर्मचारी संघटनांनी काळ्याफिती लावून कामकाज करत शासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढावेत, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.



महाराष्ट्रातील राज्य सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनेक मूलभूत व दीर्घकालीन प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कृती समितीच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करूनही शासन स्तरावर अपेक्षित निर्णय होत नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांनंतर मिळणारी आश्वासित प्रगती योजना लागू करणे, उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजारोखीकरण अंतिम वेतनाच्या आधारे अदा करणे, रिक्त शिक्षकेतर पदभरतीस मंजुरी देणे, तसेच प्रयोगशाळा सहाय्यक व परिचरांना पूर्ववत लाभ सुरू करणे या मागण्यांचा समावेश आहे.

तसेच नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांतील मुख्य लिपिक व वरिष्ठ लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे निकाली काढणे, न्यायप्रविष्ट नसलेल्या महाविद्यालयांतील प्रयोगशाळा सहाय्यकांची सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करणे, पदोन्नतीचे प्रमाण ५०:५० ऐवजी ८०:२० करण्यास मान्यता देणे तसेच बंद करण्यात आलेली डीसीपीएस वर्गणी कपात पुन्हा सुरू करणे या मागण्याही करण्यात आल्या आहेत.

आंदोलनाच्या पुढील टप्प्यांमध्ये १८ ते २० मे दरम्यान दुपारच्या सुट्टीत धरणे, निषेध सभा व घोषणाबाजी, २५ मे रोजी राज्यव्यापी लेखणी बंद आंदोलन, २९ मे रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयांसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने निर्णय न घेतल्यास १ जून रोजी लाक्षणिक कामबंद आंदोलन तर ८ जून २०२६ पासून बेमुदत संप आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

या आंदोलनात विद्यापीठातील अधिकारी फोरम, विद्यापीठ कर्मचारी संघ, मागासवर्गीय कर्मचारी संघटना,विद्यापीठ कर्मचारी संघटना तसेच विद्यापीठ कर्मचारी फंड संघटना आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला असून शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत किनवट पोूलीसांची अवैध दारू विक्रेत्यावर धाड

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १४ मे -**

जिल्हाभर सुरू असलेल्या ऑपरेशन क्रॅक डाऊन मोहिमेअंतर्गत किनवट पोलिसांनी अंबाडी येथे अवैध दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक (झडख) सागर झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने बुधवार, दि. १३ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८.२० वाजण्याच्या सुमारास मौजे अंबाडी ता. किनवट येथे छापा टाकला. यावेळी आरोपी रामप्रसाद दर्शनलाल जैस्वाल (रा. अंबाडी, ता. किनवट) यांच्या राहत्या



घराची झडती घेतली असता तेथे देशी व विदेशी बनावटीची अवैध दारू साठवून विक्रीसाठी ठेवलेली आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळावरून अंदाजे १५ हजार १४० रुपयांचा देशी-विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००/२०२६ नोंद करण्यात आला असून महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार डगवाल यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली झडख सागर झाडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार डुकरे, डगवाल, पुरी, पोलीस शिपाई अन्नमवार, महिला पोलीस शिपाई जानगेवाड तसेच पोलीस शिपाई अनंतवार यांच्या पथकाने केली. किनवट पोलिसांच्या या कारवाईचे परिसरातून स्वागत करण्यात येत असून अवैध धंद्यांविरोधातील मोहिम आणखी तीव्र करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभाग नांदेड**

निविदा सूचना क्रं. ४/२०२६-२७ दि. १२.०५.२०२६

विभागीय अभियंता (स्थापत्य), नांदेड विभागातील खालील कामाकरिता ब-१ दर टक्केवारी नमून्यात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या योग्य श्रेणीत नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून, बंद लिफाफा पध्दतीने निविदा मागवित आहेत.

कामाचे नाव :- **१. नांदेड विभागातील अर्धापूर बसस्थानक येथे प्रवाशांसाठी तात्पूरते प्रसाधनगृह तयार करणे कामाबाबत.**

**२. नांदेड विभागातील टायर नूतनिकरण संयंत्र येथील कर्मचारी प्रसाधनगृहाची दुरुस्ती करणे कामाबाबत.**

कामाची अंदाजीत रक्कम - (१) ५९१९१०.०० (२) ३८७३५२.००
निविदा प्रकाशित व विक्री दि. १२.०५.२०२६ ते २१.०५.२०२६ पर्यंत वेळ १३.०० वाजेपर्यंत
निविदा सादर करण्याची अंतीम तारीख २१.०५.२०२६ वेळ १५.०० वाजेपर्यंत
निविदा उघडण्याची अंतीम तारीख २१.०५.२०२६ वेळ १६.०० वाजता (शक्य झाल्यास)

निविदा कागदपत्रांचे तपशिलासाठी विभागीय अभियंता, रा.प. विभागीय कार्यालय, नांदेड यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. संपर्कासाठी दुरध्वनी क्रं. ०२४६२ - २६०८८४

**विभागीय अभियंता (स्थापत्य),**
**रा. प. नांदेड**

## प्रशिक्षणातून उद्योजक घडवा, यशोगाथांतूनच संस्थेची ओळख निर्माण करा!



**बीड |** जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने रिसोर्स पर्सन व स्टाफसाठी 'क्षमता बांधणी कार्यशाळा' संपन्न*

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय ,भारत सरकार अंतर्गत जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने दीनदयाल शोध संस्थान बीड येथे रिसोर्स पर्सन आणि स्टाफसाठी एक दिवसीय 'क्षमता बांधणी कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले होते. "प्रशिक्षणातून केवळ प्रशिक्षित युवक-युवतीच नव्हे, तर यशस्वी उद्योजक तयार झाले पाहिजेत. जेवढ्या जास्त यशोगाथा तयार होतील, तितकी जन शिक्षण संस्थानची ओळख अधिक गडद होईल," असे प्रतिपादन जन शिक्षण संस्थान बीड च्या उपाध्यक्ष आणि कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ सत्यभामा चोले यांनी व्यक्त केले.

*बदलत्या नियमांचा आणि ॲक्शन प्लॅनचा आढावा*

मार्गदर्शन सत्रात जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांनी या वर्षाचा ॲक्शन प्लॅन, प्रशिक्षणाचे बदलते नियम, उपस्थितीतील सातत्य आणि *बँक कर्ज व मार्केटिंगसाठी मिळणार सहकार्य* प्रशिक्षणानंतर स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र आणि बँकांमार्फत अर्थसाह्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. यासाठी आवश्यक कागदपत्रे जसे की, *आधार कार्ड, पॅन कार्ड, प्रोजेक्ट रिपोर्ट आणि **उद्यम रजिस्ट्रेशन* यांची पूर्तता कशी करावी, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. विशेष म्हणजे, जन शिक्षण संस्थान आणि *अमेझॉन यांच्यात संभाव्य करार होणार असून, यामुळे प्रशिक्षणार्थींनी उत्पादित केलेल्या वस्तूंना जागतिक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील प्रदर्शनांतूनही विक्रीसाठी मदत केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

### पंकज बाबासाहेब सानप या रोजगार हमीवरील मजुरास 'इतर मागास बहुजन कल्याण' विभागाच्या आशीर्वादाने दिली शिक्षक मान्यता!

# बीड जिल्हयात खळबळ; मजूर आणि शिक्षक अशा दोन्ही कामांचे लाखो रुपये हडपल्याचा गंभीर प्रकार

"हा सरळ सरळ शासकीय निधीचा अपहार आहे. एकाच वेळी मजूर आणि शिक्षक म्हणून पगार उचलणे हे कायद्याने गुन्हा आहे. प्रशासन यावर निश्चितच कडक कारवाई करून गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया लवकरच करेल अशी आम्हाला प्रशासनाकडून अपेक्षा आहे."

— तक्रारदार गट

**प्रशासकीय कारवाईचा बडगा**

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी पोलीस अधीक्षक बीड यांना पत्र (क्र. २०३६/आरबी-डेस्क-१/पोल-१/निवेदन/कावि-२१३९) पाठवून तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनीही या प्रकरणाच्या चौकशीसाठी अहवाल मागवला आहे.

बीड (प्रतिनिधी): एकीकडे सुशिक्षित बेरोजगार नोकरीसाठी वणवण फिरत असताना, बीड जिल्ह्यात मात्र एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रोजगार हमी योजनेवर (MGNREGA) मजूर म्हणून काम करणाऱ्या एका व्यक्तीला 'इतर मागास बहुजन कल्याण विभागा'च्या मेहरबानीने शिक्षक म्हणून मान्यता देण्यात आली असून, संबंधित व्यक्तीने शासनाचे लाखो रुपये वेतन लाटल्याचा खळबळजनक प्रकार तक्रारदारांनी पुराव्यानिशी उघड केला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडे पुराव्यासह तक्रार दाखल करण्यात आली असून, फौजदारी गुन्हा (FIR) नोंदवण्याची मागणी होत आहे.

*काय आहे नेमके प्रकरण?*

प्राप्त माहितीनुसार, श्री. पंकज बाबासाहेब सानप हे पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील 'प्राथमिक आश्रम शाळा वडझरी या शाळेत' शिक्षक म्हणून कार्यरत असल्याचे भासवण्यात आले. मात्र, धक्कादायक बाब अशी की, ज्या काळात

त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजूर म्हणूनही नोंदणी करून मजुरीचे पैसे उचलले आहेत. त्याच कालावधीत

शिक्षक म्हणून पगार घेतला आहे म्हणजे एकाच वेळी एकच व्यक्ती पूर्णवेळ मजूर आणि शिक्षक कशी असू शकते, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

तक्रारीतील गंभीर मुद्दे:*

१. *बेकायदेशीर शिक्षक मान्यता:*

पंकज बाबासाहेब सानप यांची पदभारती करतानाची दैनिक झुंजार नेता मधील जी जाहिरात दिली आहे ती त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात ती जाहिरातच नाही. तसेच बिंदू नामावलीत त्यांच्या पदासाठीचा अनुशेष शिल्लक नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून आजतागायत संच मान्यतेत देखील रिक्त पद नाही.

पंकज सानप यांच्याकडे अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र ही नाही . कुठल्याच निकषात पात्र नसताना नियमबाह्य पद्धतीने वैयक्तिक मान्यता देण्यात आलेली आहे.

२. *एकाच वेळी दोन लाभ:* २०१३पासून संबंधित व्यक्तीने शिक्षक म्हणून शासनाकडून सुमारे ५० लाख रुपयांपेक्षा अधिक वेतन लाटले. त्याच वेळी 'रोहयो'च्या मस्टरवर हजेरी लावून मजुरीचेही पैसे लाटले.

३. *संगणमताने गैरप्रकार:* शाळेचे मुख्याध्यापक, श्री प्रवीण लिंबाजी वनवे व संस्थाचालक आणि संबंधित शिक्षक हे एकमेकांचे जवळचे नातेवाईक असून, त्यांनी संगणमताने बनावट कागदपत्रे आणि हजेरी पट तयार करून शासनाची मोठी फसवणूक केली आहे.

४. *कामावर गैरहजर:* तक्रारदारांच्या दाव्यानुसार, सानप यांनी प्रत्यक्षात शाळेत कधीही अध्यापनाचे काम केलेले नाही आणि रोहयोवरही मजूर म्हणून प्रत्यक्षात काम न करता केवळ कागदोपत्री आर्थिक अपहार केला आहे.

*तक्रारदारांची मागणी:*

दिपक सयाजीराव बांगर, राहुल अनिल थिटे व इतर कर्मचाऱ्यांनी या प्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला आहे. "संबंधित शिक्षक श्री पंकज बाबासाहेब सानप यांची मान्यता तात्काळ रद्द करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे, आतापर्यंत उचललेली सर्व रक्कम व्याजासह वसूल करावी आणि बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत," अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## मान्सूनपूर्व नालीसफाईची मागणी नगरसेविका सौ. शिल्पा जयपाल लाहोटी



परळी वैजनाथ (वार्ताहर ): शहरातील विविध भागांमध्ये तसेच प्रभाग क्र. १३ मधील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ व कचरा साचल्यामुळे पावसाळ्यात नाल्याचे पाणी रस्त्यावर येऊन नागरिक व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः मोंढा बाजार समिती परिसर व खाडी नाला येथे ही समस्या गंभीर स्वरूप धारण करत असल्याने मान्सूनपूर्व नालीसफाई तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका सौ. शिल्पा जयपाल लाहोटी यांनी केली आहे.

यासंदर्भात आज त्यांनी मा. मुख्याधिकारी, नगरपरिषद परळी-वैजनाथ यांना निवेदन दिले. प्रभाग क्र. १३ मधील खाडी नाला तसेच मोठ्या नाल्यांची तातडीने सफाई करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## मिनिकीट बियाणे वाटपासाठी अर्ज प्रक्रिया सुरू १५ मे पर्यंत अर्ज करा

### तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांचे शेतकऱ्यांना आव्हान



**अंबाजोगाई |** खरीप हंगाम २०२६ अंतर्गत विविध योजनांमार्फत वितरित करण्यात येणाऱ्या मिनीकिट बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, इच्छुक शेतकऱ्यांनी १५ मेपर्यंत अर्ज करावेत, असे तालुका कृषी अधिकारी, अंबाजोगाई श्री. विजयकुमार पवार यांनी केले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत अन्नधान्य पिकांसाठी तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत तेलबिया पिकांसाठी अनुदानित बियाणे वाटप करण्यात येणार आहे. संबंधित योजनांमध्ये निर्धारित कालावधीतील अधिसूचित वाणांसाठी अर्ज करता येणार आहेत. प्रमाणित बियाणे वितरणासाठी ज्वारी, मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांचा समावेश करण्यात आला आहे. लाभार्थी निवड "प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधित कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अटी व शर्ती लागू राहतील. तसेच नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच वैयक्तिक शेतकरी यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

### न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या सीबीएसई विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

# न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचा बारावी विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल

**अंबाजोगाई |** केंद्रीय शिक्षण मंडळ अर्थात सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन तर्फे घेण्यात आलेल्या बारावी सी.बी.एस.ई. बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच वेबसाईटवर जाहीर झाला. त्यात येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक सिनियर सेकंडरी स्कूलने बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. परीक्षेसाठी बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अंबाजोगाई येथे राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकार्यांनी एकत्र येत सन २००४ साली श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देणाऱ्या न्यु व्हिजन पब्लिक स्कूल या शाळेची स्थापना केली. शाळेने स्थापनेपासून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे. बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेत शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करून पुन्हा एकदा अंबाजोगाईचे नाव शैक्षणिक क्षेत्रात उंचावले आहे. शाळेतून प्रथम येण्याचा मान अथर्व कृष्णा राऊत याने ८९.८० टक्के गुण मिळवत पटकावला. तर रूद्रांश अशोक खंदारे याने ७८.८० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच यश प्रदीप खाडे याने ७१.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, सौ.डिंपल मोदी तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय. खडकभावी, उपप्राचार्य प्रा.वसंतराव चव्हाण, प्राचार्य डी.एच.थोरात, प्रा.




एस.ए.बिराजदार, प्रा.राघवेंद्र राजमान्य, समन्वयक विनायक मुंजे, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य पांडुरंग पाटील, समन्वयक रवींद्र राजगुरू तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. नियमित अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, एआय आधारित शिक्षण, अटल टिंकरींग आणि रोबोटिक्स लॅब, स्वतंत्र फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी लॅब, डिजिटल टिचिंग बोर्ड, मॅथ्स लॅब, कला व संगीत विषयक विशेष प्रशिक्षण, सुसज्ज क्रीडा विभाग, विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासोबतच स्कूल बस, बास्केटबॉल ग्राउंड, स्केटिंग ग्राउंड, थ्री डी पेंटिंग, ब्लॉक कोडींग, कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक कार्यशाळांचे आयोजनही केले जाते. याच संस्थेच्या माध्यमातून टॉडलर्स व्हिले प्री स्कूलमध्ये नर्सरी, एल.के.जी., यु.के. जी. वर्गांसाठी दर्जेदार शिक्षण व कृतीयुक्त अध्यापन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणारी न्यु व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाईतील अग्रगण्य शाळा म्हणून ओळखली जाते. शाळेचे अनेक माजी विद्यार्थी देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत असून विविध क्षेत्रांत यशस्वी कार्य करीत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना नर्सरी, एल.के.जी., यु.के.जी. ते बारावी पर्यंत सीबीएसई बोर्डाच्या माध्यमातून शिक्षण घ्यायचे आहे त्यांनी अधिक माहितीसाठी व प्रवेशासाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कूल, मोदी लर्निंग सेंटर, रिंग रोड, अंबाजोगाई, जि. बीड येथे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

**न्यु व्हिजन पब्लिक स्कूल मधून मिळते दर्जेदार इंग्रजी शिक्षण - संकेत मोदी :**

अंबाजोगाईत मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगरच्या धर्तीवर इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी न्यु व्हिजन पब्लिक स्कूल सुरू करण्यात आले. या शाळेने सातत्याने गुणवत्तेची परंपरा कायम ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. अनुभवी शिक्षकवृंद, अत्याधुनिक प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, ऑडिओ व्हिज्युअल क्लासरूम, लँग्वेज लॅब, स्पर्धा परीक्षांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन, कला, संगीत, क्रीडा, कराटे प्रशिक्षण तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सर्व सुविधा संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडावेत व स्पर्धेच्या युगात ते यशस्वी व्हावेत यासाठी संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी दिली आहे.

## वैद्यनाथ फंड रद्द करण्याचे आदेशाची तात्काळ अमलबजावणी करा : वसंत मुंडे

परळी(प्रतिनिधी) शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या पट्टीमधून वैद्यनाथ फंड वसूल करू नये असे आदेश असूनही कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ मार्फत कारवाई केली जात नसल्यास शासनाकडे तक्रार दाखल करणार असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सांगितले.

पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि.२०डिसेंबर २०१४ ला शेतकऱ्याकडून कोणत्याही सेवा शुल्क वसूल न करण्याची आदेश दिलेले आहेत परंतु परळी वैजनाथ कृषी उत्पन्न बाजार समिती कडून कारवाई केली जात नाही. शेतकऱ्याच्या शेती मालाच्या खरेदी विक्रीच्या बाजार समितीच्या पट्टीमधून वैद्यनाथ फंड ०.६ पैसे वसूल केला जातो . बाजार समितीच्या सहकार्याने वैद्यनाथ मंदिरा कडून फंड वसूल केला जातो. लायसनच्या वेळेस बाजार समितीकडून वैद्यनाथ फंडाच्या बाबतीत व्यापाऱ्याची अडवणूक केली जाते. सहाय्यक निबंधक परळी व जिल्हा उपनिबंधक बीड हे राजकीय दबावाखाली काम करत असून शासनाच्या आदेशाची नियमानुसार पालन करीत नाहीत त्यामुळे शेतकऱ्याला खूप मोठा त्रास परळी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून वैद्यनाथ फंडाच्या नावाखाली होत आहे. महाराष्ट्र मध्ये एका ही बाजार समितीकडून अतिरिक्त फंड वसूल केला जात नाही . बाजार समितीच्या कायद्यात तरतूद नाही परंतु शासनाचे वेळोवेळी आदेश देऊनही जिल्हा उपनिबंधक व कृषी उत्पन्न बाजार समिती नियमाचे पालन करीत नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला.

## कोचिंग क्लासेसला सुट्टी देण्यात यावी : डॉ. संजय तांदळे

**बीड( प्रतिनिधी ) |** राज्यात सध्या तापमानाचा पारा वेगाने 43 ते 45.3 अंशा वर गेला असून पुढील तीन दिवसात उष्णतेची लाट येणार असल्याचे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. बीड जिल्ह्यात दिनांक 12 मे 2026 रोजी 43 अंश डिग्री तापमान होते. उष्णतेने जिल्ह्यासह राज्यात जवळपास सात जणांचा मृत्यू झालेला आहे. राज्य शासन व जिल्हा प्रशासनाने खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर केलेल्या आहेत. बीड शहरासह जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दुपारी क्लासला जाताना उष्णतेचा त्रास होत असून अनेक विद्यार्थ्यांना उन्हाच्या तीव्रतेमुळे चक्कर आल्याचे देखील समजते.तरी दि. 14 मे 2026 गुरुवारपासून बीड शहरासह जिल्ह्यातील सर्व कोचींग क्लासेसला सुट्टी जाहीर करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटना व पालक संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी बीड जिल्हा कोचिंग क्लासेस संघटनेचे जिल्हाध्यक्ष चौभारे सर व बीड शहर कोचिंग क्लासेसचे जिल्हाध्यक्ष राम सर यांना प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावर आमच्या संघटनेची मीटिंग घेऊन निर्णय घेण्यात येईल अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली .

**DNS Bank Ltd. Ambajogai**

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०७/७०५२-०८व७०२७-३२९/**२९**/२०२६-२७ दिनांक-१३.०५.२०२६

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. श्री. गणेश भागवत पावडे (कर्जदार)
पत्ता:- गणेश पावडे,कौठा, ता.कंधार,जि.नांदेड ४३१ ७१४
२. सौ. भागश्री गणेश पावडे (सह-कर्जदार)
पत्ता:- गणेश पावडे,कौठा, ता.कंधार,जि.नांदेड ४३१ ७१४
३. श्री. विरभद्र शंकरराव गोरे
पत्ता:- राघी सिंघ, घर क्र.२-११-३५०-२, दिलीप सिंघ कॉलनी, गौवर्धन घाट, नांदेड ४३१ ६०१
४. श्री. कैलास संभाजी पाटील
पत्ता:- घर क्र.१२२ तरोडा बु. रोड,बालाजी नगर, तरोडा बु. नांदेड ४३१ ६०५

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **नांदेड**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक २९.०६.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| **१.खाते क्र.७०५२-०८ रु.७,००,०००/-** | (मालमत्ता मालकाचे नाव-गणेश भागवत पावडे) प्लॉट क्र.७९ मनपा क्र.१०-२-८८८/७३ पिन नं.४०६१००२१०७२ चा पुर्वेकडील भाग, कौठा, नांदेड, ता.जि. नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, नांदेड ज्याची लांबी दक्षिण-उत्तर ४० फु. म्हणजे १२.१९ मी. रुंदी पुर्व-पश्चिम १२ फु. म्हणजे ३.६६ मी एकुण क्षेत्रफळ ४८० स्वे.फु. म्हणजे ४४.६० चौ.मी. असुन ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे **पुर्व** :- प्लॉट क्र. ३८ **पश्चिम:-** त्या प्लॉटचा उर्वरित भाग **दक्षिण** :- खुली जागा **उत्तर** :- ६.०० मी. रस्ता (**वरील मालमत्ता "जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत"**) | कर्जखाते क्र.७०५२-०८ मुद्दल + व्याज एकुण रु.६,०६,९४२/- दिनांक ३१.०३.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ९.००% दिनांक ०१.०४.२०२६ पासुन |
| **२.खाते क्र.७०२७-३२९ रु.५,००,०००/-** | | कर्जखाते क्र.७०२७-३२९ मुद्दल + व्याज एकुण रु.२,२०,५८१/- दिनांक ३१.०३.२०२६ रोजी + पुढील व्याज @ १२.५०% दिनांक ०१.०४.२०२६ पासुन |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

२. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ.कर्जखाते क्र.७०५२-८ प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **१२.१०.२०२२**
ब.कर्जखाते क्र.७०२७-३२९प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **१२.१०.२०२२**
क. गहाणखत नोंदणी दिनांक **१६.११.२०२२ (गहाणखत नोंदणी क्र.६११६/२०२२)**

३. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

४. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे.**कर्जखाते क्र.७०५२-८ मुद्दल + व्याज एकुण रु.५,९२,४६२/- दिनांक ३०.०४.२०२६ अधिक दिनांक ०१.०५.२०२६ पासुन पुढील व्याज @९.००%** आणि **कर्जखाते क्र.७०२७-३२९ मुद्दल + व्याज एकुण रु.२,२२,९३७/- दिनांक ३०.०४.२०२६ अधिक दिनांक ०१.०५.२०२६ पासुन पुढील व्याज @१२.५०%** वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक १३.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री.अनंत गोपाळराव देशपांडे**
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

**DNS Bank Ltd. Ambajogai**

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०४/टीएल-४४८/**३१**/२०२६-२७ दिनांक १३.०५.२०२६

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. मे. गवळी किराणा स्टोअर्स प्रोप्रा. अक्षय मनोहर गवळी (कर्जदार)
पत्ता:-टीपीएस रोड, आश्रम शाळा जवळ, शिवाजी नगर, परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५
२. सौ. केवळबाई मनोहर गवळी (सह-कर्जदार)
पत्ता:- टीपीएस रोड, आश्रम शाळा जवळ, शिवाजी नगर, परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५
३. श्री. प्रशांत रमेश जगतकर
पत्ता:- साठे नगर, परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५
४. श्री. अमोल भानुदास चाटे
पत्ता:- वैद्यनाथ बँक कॉलनी, परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **परळी-वैजनाथ**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक २९.०९.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| **खाते क्र. मुदती कर्ज -४४८ रु.४,००,०००/-** | **(मालमत्ता धारका चेनाव:-**सौ.केवळबाई मनोहर गवळी **) मौजे परळी-वैजनाथ येथील शिवाजी नगर येथील सीटीएस क्र.४६०६ नगर परिषद वार्ड क्र.५(जुना),२(नवा) घर क्र. जुना १७२६ नवीन १६० क्षेत्र पुर्व-पश्चिम:३० फु. आणि दक्षिण-उत्तर २५ फु. एकुण ६९.७० चौ.मी. त्यावरील घर व बांधकामासह ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:-** मधुकर घागरमाळे **पश्चिम:-** २० फु. रस्ता **दक्षिण:-** २० फु. रस्ता **उत्तर:-** धर्माधिकारी यांची जागा | मुद्दल + व्याज एकुण रु.१,८०,०३२/- दिनांक ३०.०४.२०२६ रोजी + पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **२४.०५.२०२२**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **२३.०५.२०२२ (गहाणखत नोंदणी क्र.१६५६/२०२२)**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.१,८०,०३२/- दिनांक ३०.०४.२०२६ अधिक दिनांक ०१.०५.२०२६ पासुन पुढील व्याज @११.८५%** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक १३.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री.अनंत गोपाळराव देशपांडे**
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

**DNS Bank Ltd. Ambajogai**

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०६/७००२-२३६/**३०**/२०२६-२७ दिनांक १३.०५.२०२६

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. मे. शिवांश एजन्सीज् प्रोप्रा. सुचिता मंगेश दौंड (कर्जदार)
**पत्ता:-** ज्योती नगर,एल.आय.सी. ऑफीस जवळ,अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
२. श्री. मंगेश भास्कर दौंड
**पत्ता:-** ज्योती नगर,एल.आय.सी. ऑफीस जवळ,अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
३. श्री. सुदर्शन सिताराम मुंडे
**पत्ता:-** घर क्र.७१, हनुमान मंदीर जवळ, कन्हेरवाडी,ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ४३१ ५१५
४. श्री. भास्कर शंकर दौंड
**पत्ता:-** दौंडवाडी, घाटनांदुर,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१९

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **परळी-रोड,अंबाजोगाई**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक **२७.०६.२०२५** पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| **खाते क्र. ७००२ -२३६ रु.१५,००,०००/-** | **(मालमत्ता धारक:- भास्कर शंकरराव दौंड)** गहाणदार/जामीनदार भास्कर शंकरराव दौंड यांचे मौजे अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील ज्योती नगर, एल.आय.सी. ऑफीस जवळ ज्यांचा सर्वे नं.१७१ नगर परिषद घर क्र.९-१२७२ क्षेत्रफळ पुर्व पश्चिम १२ मी. दक्षिण उत्तर १५ मी. एकुण १८० स्वे.मी. त्यावरील बांधकाम ज्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:- प्लॉट क्र.४१ आणि ४२ चा भाग पश्चिम:- ९ मी रस्ता दक्षिण:- प्लॉट क्र.१५५ उत्तर:- ९ मी. रस्ता (**वरील मालमत्ता "जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत"**) | कर्जखाते क्र.७००२-२३६ मुद्दल + व्याज एकुण रु.१६,४९,२६२/-दिनांक३०.०४.२०२६रोजी + पुढील व्याज@१२.००% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **१६.०८.२०२४**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **२७.०८.२०२४ (गहाणखत नोंदणी क्र.५०११/२०२४)**

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **मुद्दल + व्याज एकुण रु.१६,४९,२६२/- दिनांक३०.०४.२०२६रोजी + पुढील व्याज @ १२.००% दिनांक ०१.०५.२०२६ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक १३.०७.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री.अनंत गोपाळराव देशपांडे**
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com